# श्री सन्त एकनाथ

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम 28993
विभाग
क्रमांक
नं. चि

आता ... ५ पैसे जादा ... भरावे ...

IRBK-0106979
IRBK-0106979

मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति सन १९५५
द्वितीयावृत्ति सन १९५८

* * *

प्रथमावृत्तीखेरीज शेष
सर्वाधिकार लेखकाधीन

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
दा. क्र. ६९७१ नों. दि. ....
दि. ४/२/८१

*नाथांची अभयदानाची परंपरा*
*जागती ठेवणारे*
डॉ. जोगळेकर व डॉ. वझे
*या दोघांस*

—गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | नांव | पृष्ठ क्र. नं. |
|---|---|---|
| १. | प्रतिष्ठान गोदातटीं | १ |
| २. | धन्य भानुदास | ३ |
| ३. | बाळपणींच सावधान | १४ |
| ४. | दुर्ग देवगिरी | २२ |
| ५. | केली साधना उदंड | ३६ |
| ६. | धुंडाळिलीं नाना तीर्थें | ३९ |
| ७. | धन्य गृहस्थाश्रम | ४५ |
| ८. | स्वकरें चंदन घाशी | ५३ |
| ९. | समता वर्तावी | ६२ |
| १०. | अग्निपरीक्षा | ६७ |
| ११. | देव भावाचा भुकेला | ७३ |
| १२. | प्रतिशुद्ध ज्ञानेश्वरी | ७६ |
| १३. | रसाळ भागवत | ८१ |
| १४. | भावार्थरामायण | ८७ |
| १५. | धन्य ती समाधि | ८९ |


• • •

म. ग्रं. सं. आणि, वाचनालय शाखा
ग्रं. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........ क्र. ........
संग्रहालय

# श्री सन्त एकनाथ

## १. प्रतिष्ठान गोदातटीं

गोदामाईनं त्र्यंबकेश्वराजवळ आकाशांतून उडी घेतली. तिथून ती दुथडीचे प्रांत पोशीत निघाली. सगळाच गोदामाईचा कांठ पवित्र. अगदीं रामायण कालापासून. नाशिकाजवळ पंचवटींत रामराय अन् सीतामाई नांदलीं. लक्ष्मणानं गोदातटाकीं हिंडून फळंमुळं गोळा करावींत. सीतामाईनं गोदेचं पाणी वाहून झोपडीपुढल्या फुलझाडांना घालावं. रामरायानं खांद्यावर धनुष्यबाण घेऊन गोदातीरींच्या ऋषिमुनींना अभय देत हिंडावं.

ही अशी गोदामाईची परंपर - अभयदानाची परंपरा.

हें अभयदान इथंच थांबलं नाहीं. तसंच पुढंहि चालवलं तें. कुणीं? गोदातीरींच्या माणसांनीं.

या गोदातीरीं मोठमोठीं राज्यं नांदून गेलीं. त्या राज्यांत मोठमोठे पंडित होऊन गेले. मोठमोठे शिल्पकार, मोठमोठे सन्त, मोठमोठे वीर, मोठमोठे शककर्ते..

महाराष्ट्रांत जागोजाग दगडी देवळं आहेत. दगडाचे लांबलांब चिरे. नुसते एकावर एक रचलेले. कुठं चुना नाहीं कीं माती नाहीं. पण कशीं देखणीं देवळं. केवढीं थोरलीं. कसा त्यांचा घाट. कसा त्यांचा आकार. कुणीं बांधलीं तीं?

ती कल्पना हेमाडपंताची. हा हेमाडपंत गोदातटाकींच्या एका राज्यांत प्रधान होता. मोठा कल्पक होता तो. नुसता कल्पक नव्हे. मोठा पंडितहि. त्यानं धर्मशास्त्रावर एक मोठा थोरला ग्रंथ लिहून ठेवला आहे.

शालिवाहन शक कुणीं सुरू केला? गोदातीरींच्या शालिवाहनानं. गाथासप्तशती या नांवाचा एक खूप मोठा गोष्टींचा सांठा आहे. तो कुणीं गोळा केला? गोदातीरींच्या सातवाहनानं.

इथं शालिवाहन घराणं राज्य करून गेलं. नंतर मग आंध्रांनींहि राज्य केलं. त्यांच्या राज्यांत सगळ्यांना अभय होतं. कुणीं कुणावर अन्याय करायचा नाहीं. कुणीं कुणावर जबरदस्ती करायची नाहीं. धर्मानं वागायचं. नीतीनं नांदायचं. सत्यानं चालायचं.

या राज्यांची राजधानी कुठं होती?

गोदातटाकीं—पैठणला. पैठणची फार मोठी कीर्ति. उत्तरेंत जें माहात्म्य काशीचं, तेंच दक्षिणेंत पैठणचं.

अन् पैठणला नुसता धर्मच नांदला नाहीं, तर न्यायहि पैठणलाच येऊन राहिला. दूरदूरचे वादविवाद, भांडणं, हीं तुटायला यायचीं पैठणला. असं पैठणचं महत्त्व फार वाढलं. पैठण दाखवील त्या दिशेनं दक्षिण चालूं लागायची. पैठण चालेल, त्या वाटेनं महाराष्ट्राचं पाऊल पडायचं.

म्हणून तर इंद्रायणीतटाकींच्या ज्ञानोबांना न्याय मागण्यासाठीं पैठणला यावं लागलं. अन् मग पैठणनं जो निर्णय दिला, तो महाराष्ट्रानं उरींशिरीं वागवला. पैठणच्या परीक्षेला ज्ञानोबा उतरले, अन् त्यानंतर त्यांची कीर्ति त्रिखंडांत दुमदुमली.

अशा त्या धर्मनिधान पैठणीं एक ब्राह्मणाचं कुटुंब नांदायचं. गोदातीरींची शेती मोठी सुपीक. मोत्यासारखी ज्वारी पिकते तिथं. त्या ब्राह्मण कुटुंबाच्या घरीं सगळं कांहीं होतं. सुपीक शेती होती, दूध होतं, दुभतं होतं.

दूधदुभतं तर अनेकांच्या घरीं असतं. पण दानबुद्धि नसते. हें सगळं आपणच खावं. दुसऱ्या कुणा उपाशातापाशाला थेंब सुद्धां देऊं नये. आपलं भागलं म्हणजे झालं. उरलं तें मोरींत ओतून द्यावं, पण कुणाच्या तोंडीं कांहीं लागूं देऊं नये. अशीं कद्रू असतात कांहीं माणसं.

पण हा ब्राह्मण तसा नव्हता. पैठण हें तीर्थाचं ठिकाण. तिथं साधु यायचा, संन्यासी यायचा. अतिथि यायचा, अभ्यागत यायचा. तहानला यायचा, भुकेला यायचा. या सगळ्यांना कधीं या ब्राह्मणानं नाहीं म्हटलं नाहीं. जें वेळेवर हातीं लाभलं, तें वांटीत गेला.

म्हणून त्याच्या कुळीं मुलगा झाला, तोहि तसाच. त्याचं नांव भानुदास.

○ ○ ○

## २. धन्य भानुदास

भानुदासाला लहानपणापासून देवाचा छंद. पैठणला अनेक माणसं निरनिराळीं व्रतं अन् वैकल्यं करीत असायचीं. लहानग्या भानुदासानं मोठ्या कौतुकानं तीं व्रतं–वैकल्यं पाहावींत. पण नेहमीं त्याचा गोंधळ होई, त्याला कांहीं कळेना.

बाहेर गोरगरीब अन्नासाठीं दांतांच्या कण्या करताहेत. अन् आंत यज्ञांत तुपाच्या घागरी ओतल्या जाताहेत. हें काय? हें तूप देवाला पोंचतं का? या गोरगरिबांत देव नाहीं का?

देवींदेवतांच्या समोर बकरीं मारलीं जात. हें काय देवाला रक्त हवं असतं का? अन् मग कापणारा आपलं क़ां देत नाहीं? आपली मांडी कां कापीत नाहीं?

गोरगरिबांच्या उपयोगी पडणं टाकून हीं माणसं नाक धरून घाटांवर कां बसतात? गोदेंत आंघोळ करणाऱ्या बायाबापड्यांकडे हीं कां टक लावून पाहतात? डोळे कां झांकीत नाहींत? अशानं त्यांना देव भेटतो का?

भानुदासाला मोठं कोडं पडे. तो गोदातीरावर जाई. तिथं एखादा शास्त्री पाण्यांत सूर्याकडे पाहात तासन् तास उभा असे. भानुदास हळूच त्याला विचारी,

"अहो, मी एक विचारूं का तुम्हांला ?"

"विचार."

"हें असं सूर्याकडे पाहिलं म्हणजे काय होतं ?"

"सूर्यलोक मिळतो."

"सूर्यलोक कुठं आहे ?"

"मला नाहीं माहीत. शास्त्रांत तसं सांगितलंय्."

"अन् हा लोक नाहीं आवडत का तुम्हांला ?"

"मला नाहीं माहीत ! फाजील कुठला !"

भानुदास एवढंसं तोंड करून तिथून उठे. तो एखाद्या पाठशाळेंत जाई. तिथं मुलं शेंड्यांना गांठी मारून मारे घोकंपट्टी करीत बसत. भानुदास त्यांना विचारी,

"हें असं पाठ केलं म्हणजे काय होतं ?"

"माणूस विद्वान् होतो."

"मग ?"

"मग त्याला कीर्ति मिळते."

"पण देव मिळतो का ?

"आम्हांला नाहीं माहीत ! फाजील कुठला !"

जिथं जाऊन विचारील तिथं हें उत्तर ! कुणी धडपणं सांगायचं नाहीं. पण सांगतील तरी कुठून ? त्यांनाच कुठं माहीत होतं ?

भानुदासाचं मन लागेना. कशांतच लागेना. जर देव भेटत नसेल, तर मग हें सगळं कशाला ? पोथ्या कशाला अन् पुस्तकं कशाला ? संध्या कशाला अन् जप कशाला ? प्रवचनं कशाला अन् कीर्तनं कशाला ?

भानुदासाच्या वडिलांना हें चिन्ह बरं दिसेना. त्यांना वाटे, हें पोर अभ्यास करीत नाहीं. वेद म्हणत नाहीं. घोकीत बसत नाहीं. संथा घेत नाहीं. असं कसं हें कुलक्षणी ! त्यांनीं भानुदासाला समजावून पाहिलं. गोडीनं सांगून पाहिलं. शेवटीं एका दिवशीं ते खूप रागावले. खूप संतापले. भानुदासाचं तोंड एवढंसं झालं. तें पोर आंसवं ढाळूं लागलं.

आतां काय करायचं ?

भानुदास काय म्हणतो, तें वडिलांना कळत नाहीं. वडील सांगतात, तें भानुदासाला रुचत नाहीं ! शेवटीं तें दहा वर्षांचं पोर घरांतून बाहेर पडलं. गांवाबाहेर गेलं. तिथं एक पडकं देऊळ होतं. त्याचं एक ओसाड तळघर होतं. भानुदास त्या तळघरांत शिरला. म्हणाला,

"आतां मी घरीं जायचा नाहीं. मुळींच नाहीं. बाबा मला रागावतात. सगळे मला रागावतात. मग असा हा ठोंब्या मुलगा मी ! घरीं कशाला जाऊं ?"

त्या तळघरांत भानुदासाला एक मूर्ति दिसली. सूर्यनारायणाची. भानुदासाला काय वाटलं कोण जाणे. त्यानं पटकन् त्या मूर्तीचे पाय धरले, अन् तिला म्हणाला,

"देवा, तुला सगळं कळतं. माझ्या मनांतलंहि तुला समजतं. सांग तूंच, मी चुकलों का ? सांग ना ?"

मूर्ति काय बोलणार ? ती बोलत नाहीं हें पाहून भानुदास म्हणाला,

"बोलत नाहींस तूं ? नको बोलूंस. मी असाच इथें पडून राहीन. न खातां पितां. माझं काय जातंय् ?"

ती दुपार गेली. संध्याकाळ. रात्र. दुसरा दिवस गेला. तिसरी सकाळ उजाडली. तरी भानुदास डोकं वर उचलीना !

तिसऱ्या दुपारीं एक तेजस्वी ब्राह्मण दुधाची लोटी घेऊन तळघरांत शिरला. भानुदासाच्या पाठीवरून ममतेचा हात फिरवीत तो म्हणाला,

"भानुदासा ! ऊठ राजा. हें दूध पी."

भानुदासाला मोठं आश्चर्य वाटलं. तो म्हणाला,

" तुम्ही कोण आहांत ? "

" मी ? मी असाच एक ब्राह्मण."

" इथं कसे आलांत तुम्ही ? "

ब्राह्मण खुदकन् हसून म्हणाला,

" कसा आलों ? मला देवानं पाठवलं ! "

" देवानं ? या देवानं ?

" हो. दूध पी ना हें ! "

भानुदासाच्यानं नाहीं म्हणवलं नाहीं. तो दूध प्यायला. त्याची समाधि लागली !

असं सात दिवस घडलं. रोज ब्राह्मण यायचा. भानुदासाला दूध पाजून त्याची समाधि लावून जायचा ! आठव्या दिवशीं ज्ञानी भानुदास भुयाराबाहेर पडला !

देवाचं गुपीत भानुदासाला कळलं. तेव्हांपासून तो सगळीकडे देव पाहूं लागला. नारायण सगळ्या जगांत भरला आहे. त्याची पूजा करायची. कशी करायची ? भुकेल्याला अन्न द्यायचं. तहानल्याला पाणी द्यायचं. अनाथाला आसरा द्यायचा. आंधळ्याला वाट दाखवायची. लंगड्याला हात द्यायचा.

अशी देवाची सेवा भानुदासाच्या हातून घडायला लागली. परिणाम काय झाला ?

परिणाम फार मोठा झाला. मोठेपणीं भानुदासानं पंढरीला जावं. श्रीहरीला डोळेभरी पाहावं. आपलं सुखदुःख देवाला सांगावं. त्याचा निरोप घेऊन परतावं.

पण एकदां पंढरीला नवल घडलं. साधुसंतांच्या या पाटिल्कीवर संकट आलं. काय झालं ?

विजयानगरचा राजा कृष्णदेवराय. मोठा समर्थ. केवढी थोरली त्याची सेना. केवढं थोरलं त्याचं वैभव. नुसतं वैभवच नव्हे, तर तो मोठा भक्ताहि

होता. एकदां त्याच्या मनीं भाव उपजला. पंढरीला जावं. विठ्ठलरायाला उराउरीं भेटावं.

तो मोठ्या थाटामाटानं पंढरीला आला. श्रीहरीचं दर्शन घेतलं. तो मूर्ति पाहून त्याला लोभ सुटला. मूर्ति मोठी देखणी. गोजिरवाणी. प्रसन्न वदन. कमळासारखे डोळे. कटीवर हात ठेवून श्रीविठ्ठल प्रेमभरानं भक्ताकडे पाहतो आहे. असं हें सुंदर ध्यान कृष्णदेवरायाच्या मनास आलं. ह्या मूर्तीचं रोज दर्शन घ्यावं.

पण हें घडायचं कसं ?

पंढरपूर तर विजयानगरपासून कितीतरी लांब. मग मूर्तीच उचलून घेऊन जायचं ठरवलं त्यानं !

राजाच तो. सर्वसत्ताधारी. मूर्ति काढायला लावली त्यानं. भक्त आडवे पडले. पण राजा म्हणाला,

"वेड्यांनो ! तुम्ही कसली कर्माची पूजा करतां देवाची ? आहेच काय तुमच्याजवळ ? नुसत्या रानतुळशीच्या माळा अन् गोपीचंदनाचा लेपाटा ! तेवढं मात्र देवाच्या अंगावर घालून तुम्ही त्याची अशी दुर्दशा केली आहे ! आतां माझ्या घरीं बघा त्याचा थाट !

"कसला थाट ?"

"कसला थाट ? तळ्यांतल्या नीलकमलांच्या माळा. रत्नांचे अन् मोत्यांचे दागिने. केशरकस्तुरीचं गंध. पंचपक्वानांचा नैवेद्य !"

मग कृष्णदेवरायानं पंढरपुरापासून विजयानगरपर्यंत जागोजाग सांवळे ब्राह्मण उभे केले ! त्यांच्या हातोहातीं मूर्ति विजयानगरला पोंचली. तिथें भलं थोरलं देऊळ बांधलं. मोठ्या थाटामाटांत, कडी-कुलुपांत विठ्ठल राजाची पूजा घेऊं लागला !

झालं. पंढरीची कळा गेली. आषाढी एकादशीला भक्त आले खरे, पण देवळांत देव नाहीं ! सगळे रडूं स्फुंदूं लागले. पण विजयानगरला जाऊन देवाला हांक घालून परत आणण्याचं कांहीं कोणाला सुचेना !

अन् शेवटीं आला भानुदास. त्यानं ही भोळ्याभाविकांची दुर्दशा पाहिली. सगळा इतिहास ऐकला. आणि मग तो फार मोठा माणूस त्या भक्तांना अभय देत म्हणाला,

" असं दुःख करूं नका. थोडा धीर धरा. '

" कसा धरूं धीर ! आमच ^ री–"

" तो प येईल ! "

" अहो भानुदास ! तुम्हांला माहीत नाहीं. "

" काय ? "

" आतां नाहीं देव परत यायचा ! "

" कां ? "

" त्याला चारीठाव वाढलेला नैवेद्य मिळतोय् तिथं ! मारे भरजरी वस्त्रं ! मोत्यांची पगडी–'

" काय वाटेल तें असलं तरी देव परत येईल. "

" अहो, पण कसा !

" देवाला आवडतो निश्चय. त्याला आवडते श्रद्धा. त्याला आवडतो निधडेपणा. मी जाऊन त्याला परत आणीन. खरोखरीच आणीन ! "

भानुदास निघाला. तो विजयानगरला आला. तिथं तो विठ्ठलाच्या दारीं उभा ठाकला. पण देवळावर तर पहारे ! कारण देवाच्या अंगावर हिऱ्यामोत्यांचे दागिने !

भानुदास हसून म्हणाला.

" देवा, तूं मोठा लाघवी आहेस. पंढरीचं दैन्य पाहून इथं सुखांत येऊन राहिलास खरा. पण गड्या रे, तुझी जागा ही नव्हे ! पंढरीचं वाळवंट हेंच तुझं खरं स्थान. तूं त्या गांवचा पाटील. इथं कांहीं झालं तरी मी तुला राहूं देणार नाहीं. तुझे भक्त तुझी वाट पाहताहेत. चल कसा !"

अन् भानुदास राउळांत निघाला. कुणींहि त्याला अडवलं नाहीं. तो सरळ विठ्ठलमूर्तीजवळ पोंचला.

पुजारी नुकतीच देवाची शेजारती करून परतले होते. देवळांत कोणीहि नव्हतें. भानुदास आणि विठ्ठलराय. भानुदासानं देवाच्या पायीं कडकडून मिठी मारली, अन् बोलला,

" वा देवा ! आहे बुवा तुझा थाटमाट ! पण मला माहीत आहे, तुला इथं कड्याकुलुपांत करमत नसेल. पंढरीच्या वाळवंटांत साध्या-भोळ्यांबरोबर नाचावं, असं नाहीं तुला वाटत ? "

" वाटतं रे भानुदासा ! "

" मग इथं कां राहिला आहेस ? "

" कोणी तरी असा निश्चयी वीर हवा होता मला. मी त्याचीच वाट पाहात होतों. तूं आलास, आतां माझी कामना पुरी झाली. "

" मग चलतोस ना ! "

" थांब थोडा. या कृष्णदेवरायालाहि निश्चयी भक्ताचा महिमा कळूं दे."

देवानं भानुदासाला कडकडून मिठी मारली. आपल्या गळ्यांतला तुलसीहार त्याच्या गळ्यांत घातला. नुसता तुलसीहारच नव्हे, तर त्याच्याबरोबर रत्नहारहि !

भानुदास मोठ्या समाधानानं रावळाबाहेर पडला. तोंवर आकाश तांबडं झालं होतं. तो तुंगभद्रेच्या तीरावर गेला. शीतळ जळांत स्नान केलं, अन् बाहेर निघून भूपाळ्या म्हणत भानुदास मोठ्या आनंदानं डोलूं लागला !

काकडआरती करायला पुजारी देवळांत गेले. पाहतात तों काय ! देवाच्या गळ्यांत हार नाहीं ! त्यांच्या डोळ्यांपुढं चांदण्या चमकल्या. भयानं बोबडी वळली त्यांची.. आतां राजा खचितच जबर शिक्षा करणार ! केवढा मूल्यवान् हार. रात्रीं होता अन् आतां नाहीं !

पण राजाला सांगितलं पाहिजे. नाहीं तर तो डोकं मारायला सुद्धां कमी करायचा नाहीं !

हात बांधून गडबडा लोळत पुजाऱ्यांनीं राजाला सांगितलं,

"राजराज ! देवाचा हार गेला !"

"गेला ? केव्हां गेला ? कसा गेला ? कुणीं नेला ? कां गेला ?"

"माहीत नाहीं हो राजराज ! रात्रीं होता, अन् आतां नाहीं !"

"नाहीं ? नाहीं कसा ! शोधून काढा !"

झालं. राजदूत चहूं दिशांना शोधीत निघाले. पण त्यांना फार दूरवर जावंच लागलं नाहीं. तुंगभद्रेच्या तीरावरच त्यांना हार दिसला.—

भानुदास डोळे मिटून भूपाळ्या म्हणत होता. आनंदानं उतलामातला होता. अष्टसात्त्विक भाव जागे झाले होते. डोळ्यांचीं संपुटं झांकोळलीं होतीं. अंगावर रोमांच उभे ठाकले होते. अश्रूंच्या धारा चालल्या होत्या. त्याच्या गळ्यांत तुलसीहार होता, अन् रत्नहारहि !

दूतांना ब्रह्मानंद झाला. त्यांनीं भानुदासाला धरलं, अन् मारीत झोडीत चावडीच्या खांबाला नेऊन बांधलं. धांवत ते राजाकडे गेले, अन् म्हणाले,

"राजराज, चोर सांपडला !"

"सांपडला ? कोण आहे तो ? कोणी भिल्ल ? दरोडेखोर ?"

"नव्हे राजराज, मोरे टिळेमाळा ल्यालेला एक भोंदू आहे !"

राजा भडकला. तो ओरडला,

"असं ? तर मग आत्तांच्या आत्तां सुळीं द्या—जा !"

दूत धांवत भानुदासाकडे आले. त्यांनीं त्याच्या खांद्यावर सूळ दिला. अन् म्हणाले,

"चलावं महाराज !"

भानुदासाला मोठं कोडं पडलं होतं. देवाचा हार आपल्या गळ्यांत कसा आला ! पण त्याला माहीत होतं. देव करतो तें चांगलंच असतं. त्यानं विचारलं,

"मला कुठं नेतां ?"

"कुठं ? आपली पूजा बांधायची आहे !"

भानुदास म्हणाला,

" कुठं का न्याना ! तुम्ही चांगलंच कराल ! मला माहीत आहे !"

दूतांनीं तुंगभद्रेच्या वाळवंटांत सूळ रोवला. भानुदासाचे हातपाय बांधलेले. डोळे झांकलेले. ही लोकांची गर्दी. सगळे म्हणताहेत,

" वा वा ! काय पण वेष आहे ! टिळे काय अन् माळा काय ! "

" अहो, कांहीं खरं राहिलं नाहीं बरं ! "

" यानं चोरी केली, असं कोणी तरी म्हणेल का ? "

" कांहीं सांगू नका तुम्ही ! कळा कामधेनूची, अन् करणी कसाबाची ! "

आणि भानुदास ?

त्याच्या मुखावर विषादाची छटाहि नव्हती ! तो प्रसन्न होता. मुद्रेवर समाधान होतं. तो मोठ्या विश्वासानं म्हणत होता,

" श्रीहरि ! ऐक ! आकाश कोसळतंय् ? कोसळूं दे. ब्रह्मांड तडकून फुटतंय् ? फुटूं दे. वडवानल त्रिभुवनाला जाळीत सुटला ? सुटूं दे. मी तुझा आसरा सोडणार नाहीं !

**जरि हें आकाश वर पडों पाहे ।**
**ब्रह्मगोल भंगा जाये ।**
**वडवानल त्रिभुवन खाये ।**
**तरी मी तुझीच वास पाहें गा विठोबा ॥**

" श्रीविठ्ठला, मला आधार तुझ्या नामाचा. दुसऱ्या कुणाच्या पंखांखालीं जाऊं मी ?

**न करीं आणिकांचा पांगिला ।**
**नामधारक तुझाचि अंकिला ॥**

" सात सागर उसळताहेत ? उसळूं दे. सगळी धरती त्यांत विरघळून जात्ये ? विरघळूं दे. पांची महाभूतं गिळायला येताहेत ? येऊं दे. मी तुझी संगत सोडणार नाहीं. "

**सप्त सागर एकवट होती ।**
**जरी हे विरोनि जाय क्षिती ।**
**पंचमहाभूतें प्रळय पावती ।**
**तरी मी तुझाच सांगाती गा विठोबा ।।**

सूळ उभारला. सगळी तयारी झाली. लोकांचा कालवा दूर करीत दूतांनीं भानुदासाला सुळाजवळ नेलं. अन् आतां ते त्याला सुळीं देणार, तों—

तों त्या कोरडया लाकडी सुळाला पालवी फुटली ! कोंवळ्या डहाळ्या, नाजुक पानं, तांबडीं लाल. सुळाचा ताठपणा मोडला. तो लव्हाळ्यासारखा लवूं लागला !

राजदूतांनीं आश्चर्यानं तोंडावर हात ठेवले ! काय हें ! केवढं कौतुक ! ते धांवत धांवत राजाजवळ पोंचले, अन् चांचरत सांगूं लागले,

"रा–ज–राज– !"

"अरे, काय झालं ?"

"सुळाला —"

"काय ?"

"पालवी फुटली–कोंवळी पालवी !"

तसाच धांवत राजा तुंगभद्रातीरीं पोंचला. हा चमत्कार त्यानं प्रत्यक्ष पाहिला, अन् तशीच भानुदासाच्या पायीं लोळण घेतली.

"महाराज, मला क्षमा करा !"

"केली !"

"नुसती क्षमा करूं नका. तुमचा फार मोठा अपराध केला. काय करूं मी ? या अपराधाचं प्रायश्चित्त कसं घडेल माझ्या हातून ?"

"प्रायश्चित्त ? तर मग हा हार –"

"तो हवा ? दिला !"

भानुदास हसून म्हणाला,

"राजराज, मी काय करूं याचं?"

"मग?"

"हा ज्या मूर्तीच्या गळ्यांत होता, ती—"

"विठ्ठलमूर्ति?"

"हो! तेवढी मला दे!"

राजाच्या डोळ्यांत आंसवं उभीं राहिलीं. तो म्हणाला,

"महाराज, माझ्या मुखांतून शब्द गेला! आपण मूर्ति घेऊन जा. पण ती कशी न्याल?"

"विठ्ठलाची इच्छा असेल, तर तो स्वतःच माझ्याबरोबर येईल."

ते दोघे देवळांत गेले. भानुदासानं विठ्ठलचरणीं कव घातली, अन् म्हणाला,

"विठूराया, चलणार ना?"

तत्काळ विठ्ठलमूर्ति अगदीं लहान झाली! भानुदासानं ती आपल्या पडशींत घातली अन् तो निघाला.

पंढरीला वारकऱ्यांचा थवा भानुदासाची वाट पाहात होता. कुणी म्हणे,

"भानुदास आहेत. देवाला आणल्याशिवाय राहायचे नाहींत."

पण दुसरा उसासा सोडून बोले,

"नाहीं रे बाबा! कृष्णदेवराय कुठला मूर्ति सोडायला?"

आणि त्यांनीं जेव्हां भानुदासाला प्रसन्नमुखानं पंढरीच्या वाळवंटांत शिरतांना पाहिलं, तेव्हां हरिनामाच्या गदारोळानं आकाश अगदीं दुमदुमून गेलं!

अशा शूर भानुदासाचा पुत्र चक्रपाणि. चक्रपाणीचा सूर्यनारायण. आणि सूर्यनारायणाच्या पोटीं शके १४३५ मध्यें एक कौतुक जन्मलं! त्याचें नांव एकनाथ!

• • •

## ३. बाळपणींच सावधान

बाळ जन्मलं, तेंच मुळीं मूळ नक्षत्रावर. आईवडिलांना तें मूळच घेऊन आलं! मूळ म्हणजे देवाघरचं निमंत्रण. एकनाथ जन्मला अन् लगेच आई अन् वडील दोघंहि देवाघरीं गेलीं!

पण म्हणून कांहीं एकनाथाचं बाळसं कमी झालं नाहीं. जिवापलीकडे प्रेम करणारी आजी अन् आजोबा होते. त्यांनीं या मुलाला हातांचा पाळणा करून वाढवलं.

त्या मायेच्या सांवलींत बाळ वाढूं लागलं. एकनाथाचं बाळपण मोठं सुखांत गेलं. खेळायला सवंगडी. ऐकायला प्रवचनं अन् कीर्तनं. स्नानाला गोदामाई. झोंपायला आजीची कुशी.

भानुदासाच्या कुळांत जन्म लाभला. चांगली कुशाग्रबुद्धि लाभली. एकनाथानं जें पाहिलं, त्यांतलं चांगलं वेचलं. तें लक्षांत ठेवलं. अन् मग मोठेपणीं त्याच्यावर परमार्थाचा साज घालून तें जनताजनार्दनापुढं मांडलं.

सगळं कांहीं. बाळपणींचे खेळहि सुटले नाहींत त्यांतून. खेळांचीं मोठीं फक्कड वर्णनं केलीं आहेत एकनाथानं. टिपऱ्या, विटीदांडू, चेंडू, लगोरी, भोंवरा, लपंडाव, सुरकांडी, वावडी, एकीबेकी, पटपटसांवली, झोंबी, चिकाटी, उमान, हमामा, हुंबरी, हुतूतू—नानापरी.

विटीदांडू खेळणाऱ्या गड्याला एकनाथ म्हणतो,

"ए गड्या, आबक, दुबक, तिबक असा तिन्ही गुणांचा आपण खेळ मांडूं. चला! विटीदांडू खेळूं या. सत्त्वाची विटी. शुद्ध भावाचा दांडू. अन् मग चालूं द्या डाव!"

आबक दुबक तिबक गड्या त्रिगुण खेळ मांडूं।
खेळें विटीदांडू आतां खेळें विटीदांडू ॥
सत्त्व विटी घेऊन हातीं भाव धरीं दांडू ॥

भोंवऱ्याची गंमत वर्णन करतांना नाथ सांगतो,

"इथं एकाच्या भोंवऱ्यावर आपल्या भोंवऱ्याची आरी मारायची घाई चालली आहे. कुणाची कुणाला दया नाहीं."

**एकावरी एक मारिती घाय।**
**दया नाहीं कवणाखालीं न ठेविती पाय।**

एकीबेकीच्या खुणा सांगतांना तर नाथानं मोठी मजा केली आहे. तो म्हणतो,

"ए पोरा! सांग. एकी कीं बेकी? एकी म्हणशील तर जिंकशील. बेकी म्हणालास, तर हारशील बघ. अरे, इथें तर कांहींच नव्हतं. एकीहि नव्हती अन् बेकीहि नव्हती. पण मग एक शून्य झालं. अन् त्या शून्यांतून हें सगळं ब्रह्मांड उभं राहिलं."

**एकीबेकी पोरा सांग झडकरी।**
**एकी म्हणतां जिंकिशी बेकी म्हणतां हारी॥**
**नव्हे काईबाई तिथें झालें एक शून्य।**
**त्यासी फाटा फुटतां मग लेखा आलें जाण॥**

अन् नुसते खेळच नव्हेत. एकनाथाची बुद्धि मोठी साक्षेपी. पैठणला अनेक साधु येत. जपी येत. तपी येत. संन्यासी येत. योगी येत. तिथें किती तरी महंत; किती तरी बैरागी, गोसावी, मानभाव, फडकरी, भजनी, पुजारी, कथेकरी, पुराणिक.

एकनाथ या सगळ्या मंडळींना पाही. तो साधूंच्या जवळ जाऊन बसे. जपी अन् तपी जपतप करीत. ते मोठ्या चौकसपणं पाही. योगी आसनांचा पसारा मांडीत. एकनाथ तेंहि न्याहाळी. महंतांच्या मठांतून तो वारंवार जाऊन येई. बैराग्यांच्या धुन्यांजवळ शेकत बसे. फडकऱ्यांच्या फडांवरलीं भजनं ऐके. पुजाऱ्यांच्या पूजा पाही. कथेकऱ्यांचीं कीर्तनं अन् प्रवचनं ऐके.

पण मग त्याला मोठं आश्चर्य वाटे. ही सगळी मंडळी जपंतपं करतात. आसनांच्या उतरंडी रचतात. महंतपणाचा डौल आणतात. जटा पिंजारून गांजा ओढतात. कीर्तनांत माया अन् ब्रह्म सांगतात. अन् हे सगळे असे रिते कां? कोणीच भरलेला कसा नाहीं? सगळेच खडखड कां वाजतात?

सगळे म्हणजे झाडून सगळे. ब्राह्मण तसेच. क्षत्रिय तसेच. हे लोक गप्पा तर खूप मारतात. अर्जुनानं एवढं सैन्य मारलं, अन् भीमानं गदेच्या एका टोल्यांत राक्षसाचा प्राण घेतला! मग हे लोक कां तसं करीत नाहींत?

राजवट मुसलमानांची. त्यांनीं राज्य करायचं. यांनीं नुसत्या नोकऱ्या करायच्या. धर्मावर निष्ठा नाहीं, स्नानावर नाहीं, संध्येवर नाहीं. सारखं त्या अधिकाऱ्यांच्या भोंवतीं गोंडा घोळीत फिरायचं. दिसायला गोरे गोमटे. असायला कपाळकरंटे. कनक नांवाचं फळ असतं, बाहेरून मोठं देखणं. पण आंत अगदीं कडू घाण! तसे.

**स्नानसंध्या शौचाचार।**
**स्वधर्म नावडे साचार॥**
**कनक फळ नाम गोमटें।**
**बाहेर, आंत दिसे कांटे॥**
**ऐसी आचारहीन बापुडी।**
**एकाजनार्दनीं न धरी गोडी॥**

पैठण हें क्षेत्र. तिथं किती तरी यात्रेकरू गोदास्नानाला यायचे. त्यांच्यामागं ब्राह्मणाची झुंबड. हातांत पाणी घ्या. बुडी मारा. पाणी सोडा. नाक धरा. कान धरा. डोळे मिटा. डोळे उघडा. एक ना दोन. हें सगळं दक्षिणेसाठीं. दक्षिणा मिळाली तर ठीक. नाहीं तर ब्राह्मण कडाकडा दांत खायचे. शिव्याशाप द्यायचे. एकनाथाला वाटे असले कसले हे ब्राह्मण? असले कसले उपाध्याय? असले कसले भिक्षुक? यांच्यामुळं तीर्थाचा तीर्थपणा गेला. तें निष्फळ झालं!

द्रव्याचिये लोभें ।
तीर्थामध्यें राहती उभे ॥
सांगती संकल्प ब्राह्मण ।
तेणें तीर्थें निष्फळ जाण ॥

भटाभिक्षुकांची ही परी, तर विद्वानांची तिसरीच परी. म्हणे आम्ही ज्ञानी. आम्ही शास्त्री. आम्ही पंडित. आम्हांला सगळं कळतं. अन् मग हे भलत्याबरोबर भांडत कां बसतात? नासक्या गोष्टीसाठीं वाद कां घालतात? म्हणे शेंडीचा घेर एवढा हवा कीं तेवढा हवा! करायचंय् काय शेंडीच्या घेराशीं? तुम्हांला शास्त्रं येतात तर तीं या बिचाऱ्या साध्या भोळया जनताजनार्दनाला शिकवा. त्याला शहाणं करा.

पण मग वाद कुणीं घालायचा?

कळतां आत्मज्ञान स्थिती ।
भलत्यासवें वाद घेती ॥

अन् पुराणिक? त्यांचं तर विचारूंच नका! पुराणांतलं ओंगळ तेवढं हुडकून काढतील. तें मिटक्या मारीत सांगतील. नांवाचे पुराणिक पण जीभ नेहमीं अमंगळ बोलणारी. अन् अशी बडबड—अशी बडबड! दुसऱ्याला बोलूं देतील कीं काय! ऊं हूं! नेहमीं यांच्याच तोंडाच्या तोफा गर्जत असायच्या.

नानापरींचे अर्थ दाखवी वोंगळ ।
सदा अमंगळ बोले जना ॥
वाचाळ आगळा वोलों नेदी लोकां ।
एका जनार्दनीं देखा फजीत होय ॥

अन् संन्याशांचं काय सांगावं? भगवीं कापडं घातलीं, कीं झाले संन्यासी. मनांत सगळा वासनांचा बुजबुजाट. मला हें हवं, मला तें हवं. मला खायला हवं, मला ल्यायला हवं. मला लाडू हवेत, मला गडू हवेत.

मारे घाटावरल्या पिंपळाखालीं आसन ठोकून बसायचे. अन् लक्ष सगळं पाण्याला येणाऱ्या बायांकडे !

रडती पोटासाठीं ।
झालों म्हणती संन्यासी ॥
घेवोनि संन्यास ध्यान पैं स्त्रियांचें
गुंतलासे आशे मायापाशीं ॥

जपी जप करीत असायचे. तपी पंचाग्निसाधन करीत बसायचे. पण शांति नाहीं, समाधान नाहीं. डोक्यांत नेहमीं राख घातलेली. मग जप कशाला ? तप कशाला ?

अहा रे निर्दैवा काय करिसी जप ।
वाउगेंचि तप शांतीवीण ॥

गोसाव्यांची तिसरीच परी. राख फांसलेले, संडमुसंड. सदा गांजाच्या चिलमी फुंकीत असायचे. धुन्यांभोंवतीं ही गर्दी. बाया-बापड्या, म्हातारे-कोतारे प्रपंचाला कंटाळलेले, दुःखानं पीडलेले, त्यांना हे गोसावडे थापा मारायचे.

" हमकू आटा देव ! तुम्हारा भला हो जायगा ! हमकू घी देव, तुमको बच्चा हो जायगा ! "

लावोनिया अंगा राख ।
म्हणती सुख आम्हांपाशीं ॥
भोळ्याभाविकां भोंदिती ।
भलते मंत्र तयां देती ॥

अन् या सगळ्यांवर कडी कथेकऱ्यांची अन् पुराणिकांची !

खायला प्यायला चांगलंचुंगलं असलं, तर मग हे खूष ! मग मारे रंगरंगून कथा सांगतील. द्रौपदीवस्त्रहरणाची. तिचीं लुगडीं दुःशासनानं कशीं फेडलीं. मग ती कशी दिसली. मेनका कशी. रंभा कशी. उर्वशी

कशी. तें सगळं यांना विचारून घ्या. मारे जिभल्या चाटीत सांगतील ! जणूं काय हे स्वतः पाहूनच आले आहेत.

पण खायला न मिळालं तर? मग कसली आली आहे कथा, अन् कसचं आलंय् पुराण ! पुराण गुंडाळून बुवा पसार ! शोधलं तरीं सांपडायचे नाहींत.

आहारालागीं कथा ।
करितांती पैं सर्वथा ॥
आहार मिळतां पोटभरी ।
पुराण सांगे बऱ्यापरी ॥
आहार न मिळतां जाण ।
कथेलागीं पुसे कोण ॥

अन् हे सगळे पैशाचे पुजारी. गरिबांना कोण विचारतो ! महार आहेत, मांग आहेत, कुडबुड्ये जोशी आहेत, शकुन सांगणारे सरोदे आहेत. कोल्हाटी, डोंबारी, भुत्ये, वाघ्ये, कंजारी, गोपाळ, अडबंग, वेसकर, जागल्ये, वैदू आहेत, कैकाडी आहेत. कितीतरी जमाती आहेत. त्या सगळ्या वणावणा भटकताहेत. मोठे म्हणविणारे लोक त्यांना आसरा देत नाहींत. यांनाच मिळत नाहीं म्हणा आसरा ! हे दुसऱ्याला काय देतील?

अन बिचाऱ्या या जमाती अंधारांत चांचपडताहेत. धक्के खात हिंडताहेत. भीक मागत हिंडताहेत. कसं तरी जिणं जगताहेत. गरिबाला सगळ्यांनीं लाथाडावं. पाठीवरहि मारावं अन् पोटावरहि. यांना कुणी त्राता दिसत नाहीं. यांना कुणाचा आधार नाहीं. यांना कुणी अभयदाता दिसत नाहीं ! कुणी यांचा त्राता होईल का? कुणी यांना वाट दाखवील का?

एकनाथानं हें सगळं पाहिलं. त्याचं सगळं नीटनेटकं सुरू होतं. आजा अन् आजी सगळं नेटकं करीत होतीं. स्नानसंध्या, ब्रह्मकर्म, हें सगळं. पुराण सांगायला एक शास्त्रीबुवा यायचे घरीं. एकनाथ तें ऐकायचा. पण या प्रश्नांचं उत्तर नाहीं !

तो शास्त्रीबुवांना विचारी,

"शास्त्रीबुवा ! हीं माणसं अशीं दुःखी कां ?"

"त्यांचं संचित तसं आहे म्हणून."

"पण आपण त्यांना शिकवलं तर ?"

"त्यांना संस्कृत शिकायचा अधिकार नाहीं."

"मग मराठींतून सांगावं त्यांना., जगावं कसं तें सांगावं. प्रपंच कसा करावा तें सांगावं—"

शास्त्रीबुवा डोळे फाकून म्हणायचे,

"मराठींतून ?"

"कां ? काय झालं ?"

"अब्रह्मण्यम् !"

"अब्रह्मण्यम् कसलं आलंय् ? ज्ञानोबांनीं नाहीं सांगितलं मराठींत ?"

"असले वेडे प्रश्न विचारीत जाऊं नकोस ! आपलं चांगलं चुंगलं खावं-प्यावं, प्रपंच करावा, शास्त्रं शिकावींत, चर्चा कराव्यात, फड गाजवावेत, सभा जिंकाव्यात. हें सगळं सोडून हा दळभद्रीपणा कुणीं सांगितलाय तुला ? महार–मांगांचं कां एवढं कौतुक तुला ?"

नाथानं एवढंसं तोंड करून बसावं. आजीनं विचारावं,

"बाळा, तुला काय होतंय ? बरं नाहीं का ?"

"बरं आहे."

भूक लागली का ?"

"नाहीं."

नाहीं कशी ? भूकच लागली होती नाथाला. गोरगरिबांच्या कल्याणाची भूक. त्यांच्या भल्याची भूक. पण त्याची उपासमार होत होती !

कांहीं सुचेना नाथाला. काय करावं ? कोण सांगेल आपल्याला ? कोण वाट दाखवील ? कोण हात धरील आपला ?

पैठणचे सगळे संत अन् महंत त्याला माहीत होते. शास्त्री अन् पंडितांशीं त्याची ओळख होती. त्यांनाच दिसत नाहीं वाट. ते काय दाखवणार ? आडांतल्या बेडकासारखे. तिथल्या तिथें फेऱ्या घालायचे. सगळं जग हें इथंच आहे अशी फुशारकी सांगायचे.

एकनाथ नेहेमीं अस्वस्थ असायचा. आजाआजीला कांहीं कळेना. हें पोर असं एकटं एकटं कां बसतं ? याला खाणंपिणं गोड कां लागत नाहीं ? हें असं संध्याकाळचं गांवाबाहेर कां असतं ? महारामांगांच्या झोपड्यांभोंवतीं कां हिंडतं ? त्यांचीं दुःखं पाहून याच्या डोळ्यांत आंसवं कां उभीं राहतात ?

शोध केला कीं वस्तु सांपडते. इच्छा असेल तेव्ह मार्ग सांपडतो. नाथाला वाट दिसली. शोधीत होता तें सांपडलं.

एकदां एक म्हातारा पैठणाबाहेरच्या शिवालयांत येऊन उतरला. त्यानं सायंकाळीं एकनाथाला पाहिलं. तो बारा वर्षांचा मुलगा उदास होऊन ओट्यावर बसून राहिला होता.

म्हाताऱ्याचं मन कळवळलं. त्यानं एकनाथाच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं,

" बाळ, तूं असा उदास कां ? "

एकनाथाचे डोळे पटकन् पाझरले. तो म्हणाला,

" काय हो ! तुम्हांला माहीत आहे का ? "

" काय ? "

" असा एखादा साधु–जो ढोंगी नसेल. असा एखादा गुरु–ज्याला शिष्याच्या कल्याणाची तळमळ असेल. असा एखादा शास्त्री–ज्याला खरं काय तें कळलं असेल. असा एखादा संत–जो दीनदुबळ्यांच्या करुणेनं विव्हळ होत असेल–"

म्हाताऱ्यानं क्षणभर विचार केला, अन् मग सांगितलं,

" हो. असा एक पुरुष आहे. "

" कुठं ? त्याचा पत्ता सांगाल का ? "

" देवगिरीला ! तिथले किल्लेदार–त्या परगण्याचे अधिकारी–"

" अधिकारी ? "

" होय बाळ. जनार्दनपंत त्यांचं नांव. फार मोठा माणूस. नुसता परगण्याचा अधिकारी नव्हे. परमार्थातला फार श्रेष्ठ अधिकारी ! ते तुला वाट दाखवतील ! "

झालं. नाथ उठला, आणि सरळ देवगिरीची वाट चालायला लागला !

रात्र झाली आहे. होईना का ! भूक लागली आहे. लागेना का ? वाट धड माहीत नाहीं. नसेना का ! रस्त्यांत चोरांचं भय आहे. असेना का !

नाथाला त्याचं कांहीं नाहीं. त्याला प्रकाश हवा आहे. त्याला ज्ञानाचा दिवा शोधायचा आहे. त्यालं सद्गुरूला शरण जायचं आहे. मग भुकेची आणि रात्रीची चिंता कुणाला ?

आजा-आजी वाट पाहात असतील. पाहीनात का ! एकनाथ आतां सद्गुरुकृपा झाल्याशिवाय घरीं परतायचा नाहीं !

• • •

## ४. दुर्ग देवगिरी

थकला भागलेला एकनाथ देवगिरीच्या दाराशीं उभा आहे.

पैठणपासून देवगिरीपर्यंत तो सारखा चालत राहिला आहे. जेवण नाहीं, खाणं नाहीं. विसावा नाहीं. झोप नाहीं. एक आस. एक ध्यास. मला जनार्दनपंत भेटतील का ? ते माझ्यावर कृपा करतील का ?

पहारेकऱ्यांनीं हटकलं,

" क्या चाहिये ? "

" स्वामी हवे आहेत ! "

" स्वामी ? पागल वा है क्या ? जा भाग यहाँसे ! "

ते आंत जाऊं देईनात. थट्टा करूं लागले. आतां काय करायचं ? कसं शिरायचं आंत ? ही यात्रा फुकट जाईल का ? सद्गुरु भेटणार नाहींत का?

तोंच आंतून एक प्रौढ पुरुष बाहेर दाराशीं आला. भव्य, तेजस्वी मुद्रा. कमरेला तरवार बांधलेली. उंची कपडे घातलेला. तो येतांच पटापटा पहारेकरी उठले. भडाभडा मुजरे केले त्यांनीं.

एकनाथानं त्या पुरुषाकडे पाहिलं. त्यानं एकनाथाकडे पाहिलं.

" काय पाहिजे बाळ ! "

एकनाथानं ओळखलं ! आपल्या गुरूला ओळखून काढलं त्यानं. पट्टदिशीं त्यानं त्यांच्या पायांवर डोकं ठेवलं. त्याला उठवीत ते म्हणाले,

" सांग ना ! काय हवं आहे ? "

" आपली कृपा ! "

हसून जनार्दनपंत म्हणाले,

" कृपा ? कष्ट करावे लागतील ! "

" करीन, काय वाटेल तें करीन ! "

" छान. पण तूं कुठला बाळ ? "

" पैठणचा."

" चालत आलास ? दिसतंच आहे. अंगावरली धूळच सांगत्ये आहे. जेवलाहि नाहींस. नाहींस ना ? चल माझ्याबरोबर. स्नान कर. जेऊन घे. मग बोलूं या. "

एकनाथाला धन्य धन्य झालं !

काय वाटेल तें दिव्य करावं लागो, मी तें करीन. वाटेल तितके श्रम करीन. गुरुदेवांची अहोरात्र सेवा करीन. थकायचा नाहीं. थांबायचा नाहीं. विसांवा घ्यायचा नाहीं. पण याच्याजवळून शिकून घेईन. दीन-दुबळ्यांना जवळ घ्यायची विद्या. समतेचं गुज. सर्वत्र समभावाचे पाठ.

नाथानं स्नान केलं. भोजन केलं. सायंकाळीं पंतांची संध्या उरकल्या-वर दोघे बसले. आसनावर जनार्दनपंत. त्यांच्या समोर हात जोडून

नम्र एकनाथ.

"नांव काय बाळ, तुझं ?"

"एका ! एकनाथ !"

"वा ! फार चांगलं. एकनाथ म्हणजे एकविध भक्ति-एकाची उपासना करणं. सगळ्या जगांत एक परमात्मा सांठवला आहे, असं पाहणं !

नानापरी अंग जरी हें देखिलें ।
ब्रह्म हें भरलें ओतप्रोत ॥

नाथानं पटकन् पंतांचे पाय धरले. अश्रुजलानं आंघोळ घातली. पंतांनीं त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलं,

"नाथा, ऊठ. आजपासून तूं माझा एकनाथ !"

एकनाथानं तें वचन उरींशिरीं बागवलं. दुसऱ्या दिवसापासून त्याची गुरुसेवा सुरू झाली.

जनार्दनपंत फार मोठा माणूस. देवगिरी परगण्याचं सगळं काम त्यांच्याकडे. फिर्यादी, निवाडे, वसुली, बंदोबस्त, सगळं. या सगळ्या कामासाठीं दिवस कांहीं पुरायचा नाहीं. म्हणून मग पंतांनीं प्रहर रात्र राहिली तोंच उठावं. स्नान उरकून ध्यानधारणा करावी.

नाथानं हें पाहिलं. लगेच काय करायचं तें त्यानं ठरवलं.

पंतांच्या पूर्वीं नाथानं उठावं. वाडा झाडून काढावा. पंतांचं स्नानाचं पाणी उपसावं. त्यांच्या धोतराच्या निऱ्या करून द्याव्यात. त्यांचं संध्येचं मांडावं. पूजेची तयारी करावी. चंदन उगाळावं. त्यांचीं वस्त्रं धुवावीं. पूजा झाल्यावर ते बाहेर पडतांना त्यांच्या खडावा त्यांच्यासमोर ठेवाव्यात. ते जेवायला बसले, कीं त्यांना वाढावं. झोंपले कीं वारा घालावा. त्यांचे पाय दाबावे. त्यांचं अंथरूण करावं. ते झोंपल्यावर झोंपावं. नाथाचं अंथरूण पंतांच्या पायगतीं. त्यानं सजगपणं सावधान असावं.

पंत कधीं कधीं म्हणत,

" एकनाथा, किती करतोस रे ? "

नाथानं लाजून म्हणावं,

" कुठं काय करतों मी ! "

" तूं दमत नाहींस ? "

" आपली कृपा असते ना माझ्यावर ! मग थकवा कुठला ! "

" तूं मोठा चांगला मुलगा आहेस ! "

वर्ष झालं. दोन वर्षं झालीं. नाथ जनार्दनाचा झाला. वेगळेंपण कुठं राहिलं नाहीं. जनार्दनपंतांचं नाथावर अपरंपार प्रेम बसलं. ते त्याला कचेरींत घेऊन बसूं लागले.

कचेरींत कितीतरी परींचे खटले येत. वांटणींचे. भांडणांचे. मारामाऱ्यांचे. पळवापळवीचे. कधींकधीं गरीब माणसं येत. तीं पोटापाण्याला मागत. पंतांना हें सगळं पाहावं लागे. हळूहळू त्यांतला कांहीं भाग त्यांनीं नाथाकडे सोंपवला.

कुणाचे अर्ज येत. त्यांचीं उत्तर लिहावीं लागत. कुणाला ताकीदपत्र लिहावं लागे. कुणाला अभयपत्र धाडावं लागे. कुणाला आशीर्वादपत्र.

नाथ हें सगळं करूं लागला. पंतांनीं पत्रं सांगावीं‌त. नाथानं तीं लिहावींत. या पत्रांचे नाथाच्या अभंगांत मोठे देखणे नमुने आहेत.

नाथानं अर्ज केला आहे. कुणाकडे ? जनार्दनपंताकडे. तो मायना लिहून म्हणतो,

सरकारसाहेबांची आज्ञा घेऊन स्वार झालों।
तों परगणे मजकुरीं येऊन।
सरकारकाम सुरू करावयास लागलों।
तों परगणे मजकूरचे जमादार।
दंभाजी शेटे, कामाजी महाजन।
मनीराम देशमुख ममताई देशपांडीण।
क्रोधाजी नाइकवाडी।

ऐसे हरामजादे बहुत आहेत।
ते सरकारकामाचा कयासा चालूं देत नाहींत ॥

काम, क्रोध, मन, ममता, दंभ यांच्याविरुद्ध कशी सुंदर तक्रार केली आहे! अभयपत्रांत नाथानं लिहिलं आहे,

अभयपत्र जिवाजीपंतास।
कळावें कीं।
मौजे देहपुरीची वागणूक।
उत्तम स्वधर्मयुक्त चालवूं।
ऐसें तुम्हीं लिहून कळविलें।
तेणेंकरून धन्यास फार संतोष जाहला ॥

देह हें नगर. तिथं जीव हा ठाणेदार. तो धर्मानं वागला. धन्याला संतोष झाला.

एका पत्रांत शिवाजीपंत ठाणेदाराला कौल दिला आहे. देहगांवचं ठाणं नीट नांदवावं. ममताई पाटलिणीचं ऐकूं नये. कामक्रोध तिचे चाकर. त्यांच्यावर नीट लक्ष ठेवावं.

चिरंजीव शिवाजीपंत ठाणेदार।
यासी आत्मारामपंत कमाविसदार।
कसबे ब्रह्मपुरी।
आशीर्वाद उपरी।
तुम्हांस देहगांवचें ठाणें दिल्हें आहे।
तर ठाण्यांत सावधपणें वर्तणूक करणें।
तेथें ममताई पाटलीण,
तिनें लटिकेंच दंभ उभें केलें आहे।
म्हणून तुम्हांस सूचनापत्र लिहिलें आहे ॥

एका अभयपत्रांत नाथानं खूपच कडक भाषा वापरली. कामक्रोध हे वैरी दगा करतात. त्यांच्यावर पाळत ठेवून इकडे कळवावें. म्हणजे त्यांना पकडून त्यांचा शिरच्छेद करतां येईल.

काम क्रोधादिक षड्वैरी ।
आपणावर दगा करतात ।
तरी त्यांची पाळत राखून ।
इकडे निरोप कळवावा ।
म्हणजे त्यांसी धरून आणून ।
त्यांचा शिरच्छेद करतां येईल ॥

अशीं पत्रं कितीतरी आहेत. नाथ या सगळ्यांत पटाईत झाला. अन् नुसत्या पत्रांतच नव्हे, तर तरवार चालवण्यांतहि, घोड्यावर बसण्यांतहि.

एकदां नाथाची परीक्षाच झाली. जनार्दनपंत गुरुवारीं काम करीत नसत. दिवसभर ते ध्यानस्थ. मग त्यांचं काम नाथ पाही. एका गुरुवारीं माणसं धांवत नाथाकडे आलीं.

"साहेब कुठं आहेत?"

"कशाला?"

"गडावर हल्ला झाला! सांगा ना साहेब कुठं आहेत ते!"

"ते ध्यानाला बसले आहेत. चला मी येतों."

"तुम्ही? तुम्ही काय कराल?"

"काय करतां येईल तें पाहीन."

नाथ उठला. त्यानं पंतांचं चिलखत अंगावर चढवलं. तरवार कमरेला बांधली. घोड्यावर खोगीर घातलं. पंतांचं स्मरण केलं, अन् तरुण एकनाथ घोडा उडवीत बाहेर पडला!

सैन्य पंतांची वाट पाहात उभं होतं. नाथाचा आवेश पाहून तें थक्क झालं. नाथ म्हणाला,

"पाहतां काय! चला! झुंजायचं. मागं सरायचं नाहीं."

अन् सेना नाथामागं निघाली. गडाचे दरवाजे उघडले. हा वीर सेना घेऊन शत्रूवर तुटून पडला! घेमार! देमार! हाणाहाणी! कापाकापी!

शत्रुपक्ष गाफील होता. त्याला वाटलं होतं, आज गुरुवार. पंत आज ध्यान सोडून उठायचे नाहींत. तर आजच बरी संधि आहे. आज हल्ला केला तर गड सहज मिळेल.

पण पाहतात तों पंतांच्याच आवेशानं नाथ झुंजतो आहे! नाथाचं तें शौर्य पाहून सेनाहि शर्थीनं लढत्ये आहे. मारूं नाहीं तर मरूं. मागं सरणार नाहीं.

शत्रूचा धीर खचला. तो पळायला लागला. नाथानं पाठलाग करून सगळ्यांना कैद केलं. अन् तो परतला. घोडा पागेंत बांधला. चिलखत उतरून ठेवलं. स्नान केलं. जखमा धुतल्या. मग तो ज्ञानेश्वरी काढून वाचीत बसला!

पंतांना यांतलं कांहींच माहीत नाहीं. शुक्रवारीं सकाळीं ते पाहतात, तों ही कैद्यांची गर्दी! त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनीं चौकशी केली.

"एवढे कैदी कुठले?"

"कालच्या लढाईतले."

"लढाई? कसली लढाई?"

अन् मग जेव्हां पंतांना सगळा प्रकार कळला, तेव्हां त्यांना किती आनंद झाला. ते नाथाकडे गेले. म्हणाले,

"एकोबा! आम्हांला कांहीं सांगितलं नाहींस!"

"काय?"

"कालच्या लढाईचं–"

लाजून नाथ बोलला,

"त्यांत काय सांगायचं एवढं?"

"भले एकोबा! माणसानं असंच असावं. पुष्कळ करावं. कमी सांगावं."

आतां सगळी पंतांघरची व्यवस्था नाथ पाहूं लागला. देणं, घेणं, खरेदी, बाजार, सगळं सगळं. खर्चहि त्यानंच करावा. हिशोबहि त्यानंच ठेवावा. कधीं तरी तो पंतांनीं पाहावा.

एकदा नाथानं हिशोब मांडला. पण ताळा चुकूं लागला. चूक केवढी? पैची. एका पैची. पण ती चूकच. नाथ अस्वस्थ झाला. कसं झालं हें? चूक कशी राहिली? तें कांहीं नाहीं. ताळा बरोबर आला पाहिजे. चुकतां उपयोगाचा नाहीं.

रात्रीं पंत झोंपले. अन् मग एकनाथ दुसऱ्या खोलींत जाऊन पुन्हां हिशेब तपाशीत बसला! एरंडीच्या तेलाचा दिवा जळतो आहे. नाथ वारंवार वेरजा करतो आहे. पुनः बेरजा—पुनः बेरजा—पुनः बेरजा!

मध्यरात्र झाली. नाथाच्या वेरजा कांहीं संपल्या नाहींत. मध्येंच पंत जागे झाले. पाहातात तों पायगतीं नाथ नाहीं! दुसऱ्या खोलींतून प्रकाशाचा कवडसा तेवढा येतो आहे!

पंत हळू पावलांनीं खोलीकडे गेले. पाहतात, तों एकोबा हिशोबांत बुडून गेला आहे. त्याला दुसरी कशाची शुद्ध नाहीं. खोली, सामान, रात्र, दिवली सगळं हरपलं आहे. केवळ ते आंकडे दिसताहेत त्याला. हिशोबाचे आंकडे—

सांपडली! चूक सांपडली! पैची चूक—

नाथाला जणूं ब्रह्मानंद झाला. तो टाळी वाजवून खुदकन् हसला.

पंतांनीं विचारलं,

"आम्हांला नाहीं का सांगायचं?"

पंतांचा आवाज ऐकला, तेव्हां नाथ भानावर आला. त्यानं त्यांना पाहिलं, अन् असा कांहीं ओशाळला! पंत आंत येत म्हणाले,

"एकोबा, कसला आनंद झाला एवढा?"

नाथानं पटकन् पंतांचे पाय धरले.

"अरे, असं काय करतोस? सांग ना!"

"ऊं हूं!"

"कां रे?"

"क्षमा केल्याशिवाय—"

"क्षमा ? ती केलेलीच आहे. सांग आतां."

"एक चूक झाली होती."

"चूक ? केवढी ?"

"एका-एका पैची !"

"पैची ? अन् ती शोधीत बसला होतास होय एवढा वेळ ?"

"हो."

"एकोबा ! मी तुझ्यावर किती प्रसन्न झालों म्हणून सांगूं ! अरे, पैची चूक-तीहि तुला सहन झाली नाहीं ! तुझं जीवनहि असंच शुद्ध होऊं दे. त्यांत कुठं मळाचा कण येऊं देऊं नकोस. स्वच्छ धुतल्या तांदुळासारखं. गंगेच्या पाण्यासारखं. सगळ्यांच्या उपयोगी पडणारं !"

नाथानं पुनः एकदां पंतांचे पाय धरले.

अन् समाजाचं निरीक्षणहि नाथानं तिथं खूप केलं. कचेरींत सगळे यायचे. महार यायचे. मांग यायचे. चांभार यायचे. मुसलमान तर असायचेच. ते आपापलीं गाऱ्हाणीं सांगायचे. नाथानं तीं ऐकावीं. त्यांच्या पाठीवरून हात फिरवावा. तीं दूर करण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्या दुःखानं दुःखी व्हावं. त्यांच्या सुखानं सुखी.

शिवाशीव, विटाळचंडाळ हें सगळं नाथाच्या मनांतून पार निघून गेलं. सगळीकडे हरी भरला आहे, हें त्याच्या मनांत ठसलं. त्यांतल्या त्यांत शूर महारांच्या जातीवर तर नाथाचं फार प्रेम बसलं. त्यानं पांचपन्नास "जोहार" केले आहेत. फार सुंदर आहेत ते. शिवाशीव मानणाऱ्यांची खूप टर उडवली आहे त्यांच्यांत. एक जोहार तर महारा-ब्राह्मणाचा संवादच आहे.

महार ब्राह्मणाला सांगतोय्, आपण सगळीं एका आईचीं लेंकरं. भेदाभेद कुठून आणलांत हा ?

ब्राह्मण-कां रे महारा मगरमस्ता !

महार-कां हो ब्राह्मणबुवा, भलतेंच बोलतां.

ब्राह्मण-तुझ्या बापाचें भय काय ?

महार–मायबाप तुमचे आमचे एकच हाय !
ब्राह्मण–एक ऐसें बोलूं नको !
महार–निर्गुणापासून अवघे झालों !
ब्राह्मण–निर्गुण तुला काय ठावें ?
महार–आत्मस्वरूपीं शोधून पाहावें.
ब्राह्मण–आत्मस्वरूप आम्हां कळेना ।
महार–नाहीं तर संतांशीं शरण जा ना !
ब्राह्मण–संतांशीं शरण गेल्यानें काय होतें ?
महार–चौऱ्यांशीचा फेरा चुकतो.
ब्राह्मण–हें ज्ञान तुला कोठून प्राप्त झालें ?
महार–एका जनार्दनप्रसादें कळों आलें.

नाथांच्या जोहारांतला महार रड्या नाहीं. तो शूर आहे. गांवकीच्या कामांत त्याचा खूप मोठा वांटा आहे. तो सांगतो—

दरबारांतलीं देणींघेणीं उरकायला मीच जातों. रोज गांवाआधीं उठून सगळ्यांच्या बऱ्यावाइटाची मी चौकशी करतों. अन् मग ती सगळी बातमी मी धन्याला आणून पुरवतों. धन्याचा माझ्यावर भारी विश्वास आहे. तेव्हां पाटीलबोवा, माझं ऐका. नाहींतर उद्यां तुमचीच फजिती होईल बरं !"

जोहार मायबाप जोहार
मी सद्गुरु साहेबाचा लेकवळा महार ।
त्यांचे दरबारचा झाडाफेडीचा कारभार ।
मीच करतों कीं जी मायबाप ॥
सकाळींच मी उठतों ।
साऱ्या रयतेची खबर घेतों ।
येऊन धन्यास सांगतों ॥
मी धन्याचा आवडता फार ।

धन्याचा विश्वास मजवर।
धन्याचे चाकरीवर मी रुजू की जी मायबाप ॥
ऐका ऐका पाटील बोवाजी।
गांव बरा राखा राजी।
उद्यां येतील यमाजी बाजी।
फटफजिती होईल कीं जी मायबाप ॥

आपण तूपसाखर खायची, जांवयाला भरपूर वाढायचं, अन् महार भाकरीसाठीं आला कीं त्याला सगळं संपलं म्हणून सांगायचं, हें कांहीं बरं नव्हे. नाथांचा महार अशा भल्या माणसाला बजावतो,

व्याहीजांवयासी म्हणे लेंकरा।
त्यांसी वाढितां तूप साखरा।
मला देखून लपतां एकसरा।
पण अंतकाळीं चाकर मीच कीं जी मायबाप ॥
जांवयासी वाढी तूप लई।
मला म्हणतां उरलें नाहीं।
घर बुडालें याच पायीं।
प्रत्यक्ष ग्वाही मीच कीं जी मायबाप ॥

असा नाथांचा सर्वत्र समभाव झाला. लहानथोर, आपलापरका स्पृश्यअस्पृश्य हे भेद निमाले. त्यांत भर पडली. ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथराजाच्या अभ्यासाची.

पंत फार थोर विद्वान्. त्यांनीं रोज संध्याकाळीं नाथाला ज्ञानेश्वरी सांगावी. अमृतानुभव सांगावा. गीता, भागवत हें सगळं नाथाच्या मनीं जाऊन ठसलं. तें नाथाच्या आचरणांत दिसायला लागलं.

तेंव्हां मग पंतांनीं ठरवलं, कीं आतां नाथाला साक्षात् उपास्य-देवतेची भेट करवून द्यायची. ज़नार्दनपंत दत्ताचे उपासक. दत्त म्हणजे तीन देव एके ठिकाणीं. ब्रह्मा, विष्णु, महेश. उत्पत्ति, स्थिति, संहार. त्या दत्ताचं दर्शन घडवायचं नाथाला.

देवगिरीशेजारीं एका टेकडीवर खूप झाडी. पंत म्हणाले,

" एकोबा, आज गुरुवार. "

" होय स्वामी. "

" तर मग आज ध्यानधारणा नाहीं करायची. "

" मग ? "

" आज आपण पलीकडल्या टेकडीवर फिरायला जाऊं. तिथं एक तळं आहे. त्याच्या कांठीं शीतल छाया आहे. आजचा दिवस तिथं घालवूं आपण. "

दोघे गुरुशिष्य त्या टेकडीवर पोंचले. तिथं एका झाडाच्या छायेत बसल्यावर पंत म्हणाले,

" एकोबा, देव कुठं कुठं आहे ? "

" सगळीकडे. "

" कुणाकुणांत आहे ? "

" सगळ्या जीवांत आहे. "

" म्हणजे ? "

" ब्राह्मणांत आहे, शूद्रांत आहे, मातंगांत आहे, म्लेंछांत आहे— "

" तुझी खात्री आहे ना ? "

" आपली कृपा झाली आहे ना माझ्यावर ! "

अनुक्रम २८८९३ विभाग बा. वां. क्रमांक ७७ नों. दि. ३/३/

तोंच एक मलंग तिथं ठाकला ! अमंगळ वेष. अंगावर कातडं. हातीं कटोरा. बरोबर एक कुत्री. अन् तिचीं रोडकीं पिलं ! गळ्यांत एक झोळी !

पंत उठले, आणि धांवत जाऊन त्यांनीं मलंगाच्या पायांवर डोकं ठेवलं. मग दोघे झाडाखालीं बसले. अन् गुजगोष्टी बोलूं लागले.

नाथाला आश्चर्य वाटलं. पंत तर स्वच्छता आवडणारे. कपड्याला एवढासाहि डाग खपायचा नाहीं. घरांत एवढासाहि केर सहन व्हायचा

नाहीं. अन् आज हें मांडलंय् काय ! या अमंगळ मलंगाच्या गळ्यांत गळा घालून गप्पा काय मारताहेत !

एवढ्यांत मलंगानं झोळींतून शिळेपाके तुकडे काढले. मग तो पंतांना म्हणाला,

" दूध लाव ! "

नाथाला वाटलं, आतां हे दूध कुठून आणणार ! तों केवढं आश्चर्य ! पंत हातीं कटोरा घेऊन उठले, अन् रोडक्या कुत्रीजवळ जाऊन तिचं दूध काढूं लागले ! पाहतां पाहतां कटोरा भरला ! मग त्यांत मलंगानं भाकरीचा काला केला.

काय आश्चर्य ! मलंग तर खायला लागलाच, पण पंतहि मागं राहिले नाहींत ! त्यांनींहि हात मारायला सुरुवात केली !

" छे छे ! हा कांहीं नुसता मलंग नव्हे. कांहींतरी विशेष असलं पाहिजे. ब्रह्म सगळीकडे आहे. असं मी मघांच म्हणालों. हे दोघे माझी परीक्षाच पाहताहेत. "

तेवढ्यांत पंत म्हणाले,

" एकोबा ! "

" स्वामी ! "

" एवढा कटोरा धुऊन आणा जा."

नाथ आला. जवळ आला. त्यानं मलंगाच्या हातून कटोरा घेतला. अन् मग त्याला निराळंच वाटूं लागलं ! अगदीं निराळं ! कांहीं तरी गंमत आहे. आनंद वाटतोय्. सुख वाटतंय्. हें सगळं जग सुखाचं झालं आहे. अंधार कुठं उरला नाहीं. हें जग देवाचंच रूप आहे. नक्की त्याचंच. त्याहून वेगळं कांहीं नाहीं ! मजा आहे ! मजा आहे !

नाथ कटोरा घेऊन धांवत सुटला. त्यानं त्यांत पाणी घातलं. तो विसळला. अन्—

अन्—अन् पिऊन टाकला झालं !

मलंग ओरडला,

" अरे पागल ! क्या करता है ! "

नाथ त्याच गंमतीच्या धुंदींत हासून बोलला,

" प्रसाद घेतोंय् ना ? "

" किसका ? "

" कुणाचा ? माझाच प्रसाद ! मीच घेतोंय् ! मजा आहे मजा ! "

पंतांनीं मान डोलवून मलंगाला सांगितलं,

" बडा अच्छा लडका है ! "

अन् एका क्षणांत सगळं बदललं ! मलंगाच्या जागीं दत्त प्रगटले. कुत्रीच्या जागीं कामधेनु. ते हसून नाथाकडे पाहूं लागले. नाथ विजेच्या वेगानं धांवत आला, अन् दत्तांच्या पायीं कोसळला. त्याला उठवून आलिंगन देत दत्त म्हणाले,

" पंत, तुमचा एकोबा फार चांगला मुलगा आहे. आम्हांला देतां का ? "

" आपलाच आहे तो. "

" होय. आमचाच आहे. असूं द्या तुमच्याजवळ. घासून पुसून लख्ख करा. अन् मग लागूं द्या जनताजनार्दनाच्या सेवेला. दीन-दुबळ्यांचा उद्धार करूं द्या. ज्यांना कोणी नाहीं, त्यांचा हा मायबाप ! "

एकनाथानं पुनः दत्तांच्या पायीं भाळ टेकलं. दत्त अन्तर्धान पावले. दोघे गुरुशिष्य त्या आनंदांत मग्न झाले.

# ५. केली साधना उदंड

पंतांनीं ठरवलं. एकोबा बरेच दिवस आपल्याजवळ राहिला. आतां याला एकट्याला साधना करायला धाडायचं. साधनेनं माणूस शहाणा होतो. अंगीं बळ चढतं. वृत्ति रसाळ होते. ज्ञान घासलं पुसलं जातं.

पंतांनीं नाथाला हांकारलं,

"एकोबा ?"

"स्वामी !"

"आतां तूं एकट्यानं जायचंस."

"कुठं ?"

"पलीकडे शूलभंजन नांवाची टेकडी आहे, तिथं."

"कशाला स्वामी ?"

"तें तुझं तूं ठरव. मात्र एक कर."

"काय ?"

"कांहीं साक्षात्कार झाल्याशिवाय परतायचं नाहीं !"

नाथानं गुरुचरणीं मस्तक ठेवलं; अन् लगेच निघाला. एकटा. बरोबर कसलंहि सामान नाहीं. त्या टेकडीवर दाट झाडी, एक झरा.

नाथानं ठरवलं. इथं बसायचं. ध्यानधारणा करायची. मन स्थिर करायचं. त्यांत सगळ्या जगाची करुणा प्रगट होऊं द्यायची. ममतेचा प्रकाश पडूं द्यायचा. तपाच्या आगींत कामक्रोध जाळून टाकायचे. मत्सरदंभ पळवून लावायचे.

मग नाथानं तिथं एक लहानशी कुटी बांधली. जीं काय कंदमुळं मिळतील तीं खावीं. सकाळसंध्याकाळ ध्यान धरून बसावं. जगाच्या कल्याणाचं चिंतन करावं. आपणांत असणारं ब्रह्म सगळीकडे आहे, असा अनुभव घ्यावा.

एक गुराखी तिथं गुरं चारायला यायचा. त्यानं ही तेजस्वी मूर्ति पाहिली. त्याला फार बरं वाटलं. त्यानं गाईची धार काढली, अन् तांब्या हातीं घेऊन नाथाकडे गेला. समोर तांब्या ठेवून त्यानं म्हटलं,

"महाराज, इकतं हें दूध आणलंय्. हें पीत जा."

"कां आणलंत हें दूध?"

"न्हाई – माजी सरधा बसली तुमच्यावर. पिणार न्हाई, तर मला लई वाईट वाटल."

मग नाथानं त्या दुधाचा स्वीकार केला.

त्या गुराख्यानं रोज दुधाचा तांब्या घेऊन यावं. नाथानं ध्यान संपल्यावर तें दूध पिऊन टाकावं. असा क्रम सुरू झाला.

एके दिवशीं गुराखी तांब्या घेऊन जातो, तों भयानं त्याची बोबडी वळली!

नाथ झाडाखालीं आसन मांडून डोळे मिटून बसला होता, अन् त्याच्या सगळ्या अंगाला एका भल्या थोरल्या काळ्या नागानं वेटाळं घातलं होतं! फडा नाथाच्या डोक्यावर होती. वारंवार तो जिभली बाहेर काढीत नाथाच्या तोंडाजवळ तोंड नेई!

आतां! हा काळ चावेल कीं या गोजिरवाण्या लेंकराला!

अन् मग गुराखी ठोठोठो बोंबलला! पटकन् नाग वेटाळें काढीत खालीं उतरला, अन् बाजूला चालता झाला. नाथानं डोळे उघडले. घामानं भिजलेल्या गुराख्यानं धांवत येऊन नाथाला घट्ट मिठी मारली.

"काय झालं बाबा?"

"नाग–नाग–!"

गुराख्यानं जेव्हां सगळं सांगितलं, तेव्हां नाथ हसला. पटकन् त्याच्या तोंडून एक अभंग बाहेर पडला.

"आम्हांला दंश करायला काळ आला. तों काय आश्चर्य! तो कृपाळू होऊन परत गेला. त्याची आमची भली ओळख पटली. त्याचं

आमचं मन एकाकार झालं! जशी गंगायमुनेची भेट! एका जनार्दनाच्या चरणीं लागला. त्यामुळं काय झालं? त्याचं जिणं आणि मरणं दोन्ही हारपलीं! तो जनार्दनाचा झाला."

आम्हां डंखों आला काळ।
तो तंव जाहला कृपाळ॥
भली वोळखी जाली आतां।
चित्त मीनलेंसे चित्ता॥
एका जनार्दनाचे पायीं।
जिण्या मरण्या सौरसू नाहीं॥

नाथाच्या तोंडून हा अभंग उमटला, अन् काळा प्रगट झाला! नाग नव्हे. सांवळा श्रीकृष्ण. गळां तुळशीहार. कांसे पीतांबर. मोरपिसांचा मुगुट! त्यानं नाथाला आलिंगन दिलं! गुराखी तिथंच होता. त्यानं ती जिवाशिवाची भेट पाहिली. त्याचं जिणं धन्य झालं.

कृतार्थ होऊन नाथ देवगिरीवर परतला. पंतांना त्यानं हें वृत्त सांगितलं. ते भरल्या गळ्यानं म्हणाले,

"एकोबा, तूं धन्य आहेस!"

"मी? मी तर आपलं लेंकरूं. हें सगळं आपलं देणं."

"नव्हे एकोबा. इथं ज्याचा तोच. दुसऱ्याचं करण्यानं काय होतंय्? तुझा जन्म कृतार्थ झाला. अध्ययन संपलं तुझं. आतां तीर्थयात्रा. मलाहि नाशिकत्र्यंबक पाहायचं आहे. रामरायानं जिथं ऋषींना अभयदान दिलं, ती जागा डोळाभरीं न्याहाळायची आहे. चला आपण दोघेहि निघूं.

● ● ●

# ६. धुंडाळिलीं नाना तीर्थें

गुरु आणि शिष्य चालले आहेत. दोघेहि पायीं हिंडताहेत. महाराष्ट्राचीं खेडीं पाहताहेत. शेतकरी आणि कष्टकरी यांच्याबरोबर रात्र काढताहेत. त्यांना दिसतंय्—

हे सगळे गांजले आहेत. राज्य यवनांचं. त्यांच्याकडून छळ. धर्म ब्राह्मणांच्या घरीं. त्यांच्याकडून जाच. दोन्हींकडून त्रास होतोय् यांना. कुणी यांचा त्राता नाहीं. कुणी यांचा पाठीराखा नाहीं. कुणी यांना जवळ घेत नाहीं.

यवन दोन्ही बाजूंनीं छळतात. राज्यकर्ते म्हणून. अन् आपला धर्म श्रेष्ठ समजून. तसं पाहिलं तर देवाच्या घरीं कशाचा भेद! सगळीं देवाचीं लेंकरं. पण तुर्कांना वाटतं, आपण देवाचीं मुलं. बाकी सगळीं सैतानाचीं.

तेव्हां मग नाथांनीं त्या गोरगरिबांच्या बाजूनं भांडायला उभं राहावं. त्यांनीं म्हणावं.

"कसे रे तुम्ही वेडे! अरे, देव तर सगळीकडे आहे. मुंगीच्या पायांतलीं घुंगरं वाजलीं, तर तींहि त्याला ऐकूं जातील. तर तुम्ही बांग कशाला पुकारतां? तो पश्चिमेकडेच आहे? बाकी दिशा काय ओस पडल्या? नमाजाच्या पांच वेळा तेवढया देवाच्या. अन् बाकी काय सैतानाच्या? आम्ही दगडाच्या पायां पडतों म्हणून आम्हांला हसतां. अन् मग तुम्ही प्रेताच्या पूजा कां करतां? त्यांच्यावर गलेफ कशाला? माळा कशाला? धूप कशाला? एखादं जनावर आपल्या मरणानं मेलं, देवानं नेलं, तर तें नापाक. अन् तुम्हीं मारलं तर तें पाक काय रे? अरे, हिंदूहि देवानं केले, मुसलमानहि त्यानंच घडवले. मग तुम्ही हिंदूंना बाटवतां कशाला! देवाची चूक तुम्ही दुरुस्त करतां काय?"

तुमचा अभाव प्रगट केला ।
जवळील खुदा दूर बोभाइला ॥
एकबार अल्ला एकबार अल्ला ।
बाकी मग हैराण झाला ।
नाहीं भेटला अद्यापवरी ॥
खुदा माना पश्चिमेकडे ।
येर अवघें कां ओस पडे ॥
पांच वख्त खुदाचे झाले ।
बाकी वख्त काय चोरीं नेले ॥
तुमचें शास्त्र तुम्ही भुलले ।
देवासी केलें एकदेशी ॥
आम्हांसी म्हणतां पूजितां फत्तरें ।
तुम्ही कां ठेवितां प्रेतावर चिरे ॥
केवळ जें का मेलें मढें ।
त्याचीं जतन करतां हाडें ॥
फुलें गलेफ फत्तरावर चढे ।
ऊद तुम्ही पुढें जाळा ।
खुदा मारितो मुरदाड देख ॥
तुम्ही मारितां तें पवित्र चोख ?
हिन्दु मुसलमान दोन्हीहि ।
खुदानें पैदा केले भाई ॥
हिन्दूंना करतां खुदा चुकला ।
त्याहुनि थोर तुमच्या अकला ।
हिन्दूस मुसलमान केला ।
गुन्हा लाविला देवासी ॥

ताठपणं उभं राहून एकनाथांनीं मुल्लामौलव्यांशीं वाद घ्यावेत. तेव्हां मग रंजल्यागांजल्यांना केवढा धीर आला ! त्यांना वाटलं, आम्ही कांहीं नुसतेच पोरके नाहीं. आमच्यामागंहि कोणी उभा आहे !

एवढ्यानंच भागलं नाहीं. गीता ज्ञानोबानं मराठींत आणली. त्यानं भगीरथासारखी परमार्थाची गंगा मराठीच्या भूमींत आणली. तिला पाट काढून महाराष्ट्रांत कुणीं खेळवायची ? तें देवाघरचं दान घरोघरीं कुणीं पोंचवायचं ?

जनार्दनपंत म्हणाले,

"एकोबा, तूं एक काम करायचंस."

"कोणतं स्वामी ?"

"अरे ! या बिचाऱ्या महारापोरांना धर्म कळला नाहीं रे ! कळूं दिला नाहीं आजपर्यंत. धर्म राहिला संस्कृत भाषेंत. यांच्यापासून कितीतरी दूर. यांनीं वेद म्हणायचा नाहीं, बायाबापड्यांनीं म्हणायचा नाहीं. एवढी धर्माची अमृतधारा वाहिली, पण स्त्रिया अन् शूद्र दोन्हीहि तान्हेलींच राहिलीं.

"मग मला काय आज्ञा आहे ?"

"तूं चतुःश्लोकी भागवतावर मराठी टीका कर. तें तत्त्वज्ञान यांच्यापर्यंत पोंचीव."

"स्वामी ! मी ? मला येईल का टीका करतां ?"

"येईल. मी आहें ना तुझ्या पाठीशीं ? ज्ञानोबानं धडा घालून दिला. त्याच्या पावलावर पाऊल टाकून चालायचं. आलं ना लक्षांत ?"

त्या दिवशीं ते गोदेकांठीं एका गांवांत मुक्कामाला होते. एका सत्पात्र ब्राह्मणाच्या घरीं रात्रीं पंतांनीं नाथांना भागवत सांगायला बसवलं. समोर आपण बसले. गांवांतले चार जाणतेहि होते. नाथ क्षणभर बावरले. पण श्रीगुरूंनीं धीर दिल्यावर नाथांच्या मुखांतून गंगा वाहायला लागली !

जशीं मोगरीचीं फुलं, तसे देखणे शब्द. एवढे दिवस अध्ययन झालं शास्त्रांचं. ज्ञानेश्वरीचं. अनुभवामृताचं. तें सगळं आतां प्रगट व्हायला लागलं.

पंत वाहवा म्हणूं लागले. जाणते माना डोलवूं लागले. ते म्हणाले,

"असं कधीं ऐकलं नव्हतं."

"मराठींत अशी ग्रंथरचना होईलसं वाटलं नव्हतं."

"धन्य धन्य एकनाथ!"

सगळं चतुःश्लोकी भागवत मराठींत आलं. मोठं देखणं रूप घेऊन आलं. पंतांना अगदीं धन्य धन्य झालं. त्यांनीं एकनाथांना आलिंगन देऊन म्हटलं,

"एकोबा, तुझ्यासारखा शिष्य लाभला! माझा जन्म सफल झाला."

मग ते दोघे पंचवटींत आले. त्यांनीं गोदामाईत स्नान केलं, अन् ते गुरुशिष्य तिथल्या शिलातलावर बसले. एकनाथांचं मन तें स्थान पाहून हरिखलं. पंत त्यांना म्हणाले,

"एकोबा, या पंचवटींत राहून रामरायांनीं काय केलं, माहीत आहे?"

"काय केलं?"

"ते या दंडकारण्यांत हिंडले. त्यांनीं ऋषींना होत असलेले कष्ट ध्यानीं घेतले. अन् मग त्या ऋषींना अभय दिलं. ते इथं राहिले होते. त्या जागीं आपण आलों. आतां तूं काय करशील?"

"आपण सांगाल तें करीन."

"तर मग सगळीं तीर्थं पाहतां पाहतां जनस्थितीचं निरीक्षण करायचं. आज सगळा देश आंदोळून निघतो आहे. त्याला कोणी तरी त्राता हवा आहे. तेव्हां तूं धर्माचा त्राता व्हायचंस. भागवत धर्माची पताका चहूं दिशांना फडकवायचीस. करशील ना एवढं?"

"आपली कृपा असल्यावर मग मला हें करतां येईल."

एकनाथांना उत्तरेकडे चालतं करून देऊन पंत देवगिरीला परतले. नाथ एकेक तीर्थ पाहात हिंडूं लागले.

प्रभासपट्टण, सप्तपुऱ्या, प्रयाग, गया हें सगळं त्यांनीं पाहिलं. गंगा-सागरालाहि ते गेले. रामेश्वराजवळ त्यांनीं समुद्रस्नानाहि केलं. अभंगांत त्यांनीं म्हटलं आहे—

**उदंड तीर्थांची पाहिली रचना ।**
**सागरादि तीर्थें पाहतां पाहिलें ।**
**गंगासागरादि तीर्थ भूमीवरी ॥**

पण त्यांचं मन कांहीं कुठं लागेना. त्यांना वाटे, काय हें ! तीर्थांना तीर्थपणा तरी उरला आहे का ?

**प्रयागादि तीर्थें पाहतां पाहतां ।**
**न बैसे तत्त्वतां मन माझें ॥**

कुठं शुद्ध कर्म नाहीं. विधिनिषेधांचाच गुंतवाडा. हें करूं नका, तें करूं नका. या दिवसांत हें खायचं नाहीं; त्या दिवसांत त्याचा वास घ्यायचा नाहीं. नुसता देखावा. आंत सगळं पोकळ. भुंग्यानं पोखरलेल्या झाडासारखं. देवांची खरेदी अन् विक्री चालली आहे ! सगळा लबाडीचा व्यवहार. जो तो सगळ्यांना फसवायला पाहतोय्. कुणाची कुठं श्रद्धा नाहीं. सगळ्यांना भय वाटतंय्. काय होईल, कसं होईल ! कसं होईल, काय होईल !

**न चले कर्माचें आचरण ।**
**विधिनिषेधाचें महिमान ॥**
**लोपलीं तीर्थें जाण ।**
**देवप्रतिमा पाषाण ॥**
**न ठाके कोणाचा कोठें भाव ।**
**अवघा लटिका वेवसाव ॥**
**एका जनार्दनीं भेव ।**
**जेथें तेथें वसतसे ॥**

असा सगळीकडे अनाचार. पाऊस पडेना झालाय्. मग धरतीमाता पिकायची कशी?

आपुलाला धर्म नाचरीती जनीं।
अपीक धरणी पीक न होय॥
अनावृष्टि मेघ न पडे निर्धार।
ऐसा अनाचार कलीमाजीं॥

औषधांचे गुण हरपले. मंत्रांची कळा लोपली. गाईगुजींना दूध उरलं नाहीं. अन् त्याहिपेक्षां एक वाईट गोष्ट! भल्या घरच्या आयाबाया— त्यांनीं वाकडीं पावलं टाकलीं!

लोपले मंत्र औषध।
गाईस न निघे दुग्ध॥
पतिव्रता त्या शुद्ध।
अनाचार करितातीं॥

सगळा लोक भांबावलेला. दुःख त्यांच्या डोक्यावरून वाहतं आहे. मग वाटेल त्या देवाच्या नादीं लागताहेत सगळे. त्या देवाचे कांहीं भगत देवापुढें जीव मारायला सांगताहेत. दगडाच्या देवापुढं! जसा बकरेंखाऊ देव, तसे त्याचे भक्त!

लटिका देव लटिके भक्त।
लटिकें सर्व वाव॥
सात धान्याचे धपाटे मागती।
काय त्यांचा बडिवार॥
म्हणती देव मोठे मोठे।
पूजितातीं दगड गोटे॥
जीत जीवा करुनी वध।
देवा दाविती नैवेद्य॥

एवढ्यानं भागलं नाहीं. देवापुढं रक्ताचे पाट वाहताहेत. भक्त दारू पिऊन धुंद झाले आहेत! देवांतहि खरेपणा नाहीं, अन् भक्तांतहि भाव नाहीं. सगळा लटक्यांचा बाजार!

मारिती पशूंच्या दावणी ।
सुरापानीं आल्हाद तयां ॥
खरेपणा नाहीं देवाचे ते ठायीं ।
भक्त अभाविक पाहीं दोन्ही एक ॥

नाथांच्या मनाला मोठे क्लेश झाले. त्यांनीं ठरवलं, ज्ञानोबाचा फड पुन्हा जागवायचा. पंढरीचा बाजार पुन्हा भरवायचा. भक्तिभावाचं सदावर्त सुरू करायचं. हरिनामाची पाणपोई पुनः घालायची. तें सगळ्यांना वाटायचं, गोरगरिबांना, महारापोरांना, बायाबापड्यांना.

मग ते पैठणाकडे परतले.

• • •

## ७. धन्य गृहस्थाश्रम

इकडे घरून नातू निघून गेला, अन् आजाआजीवर जणूं वीज कोसळली ! त्यांनीं खूप शोधाशोध केली, कीर्तनकार, बुवा, बैरागी, भटक्ये, सगळ्यांच्या पायीं डोकीं ठेवून त्यांना विचारलं.

“ कां हो कथाकार बुवा ! आमचा एका पाहिला का हो कुठं ? ”

“ नाहीं बाई. ”

“ कां हो गोसावी महराज ! आमचा एका दिसला का तुम्हांला ? ”

“ नाहीं माई ! ”

“ काय हो संन्यासी महाराज ! तुम्ही एवढे हिंडतां. आमचा लहानगा एकनाथ भेटला का हो कुठं ? ”

“ नारायण ! आम्हीं नाहीं पाहिला ! ”

आजी नाना देवांना नाना नवस बोलली.

“ विठ्ठला, तुला सोन्याचा मुगुट वाहीन ! माझं लेंकरूं घरीं येऊं दे. ”

“ अंबाबाई, तुझी ओटी भरीन— ”

" महादेवा, तुझ्यावर एकादशणी करीन—"

" गणराया, तुझं सहस्रावर्तन करीन—"

पण बारा वर्षं निघून गेलीं. रडून रडून डोळ्यांतलं पाणी आटलं. घासभर अन्न गिळावं अन् मोठ्या आशेनं घाटावर जाऊन बसावं. कधीं भलत्याच मुलाला एकनाथ समजावं. त्याला मिठी मारूं जावं, तर सगळ्यांनीं थट्टा करावी.

शेवटीं एक ब्राह्मण फिरत फिरत आला. नेहमींप्रमाणं आजाआजीनं त्याला जेवायला बोलावलं, अन् आंसवं गाळीत विचारलं,

" काय हो, तुम्हीं आमचा एका पाहिला का कुठं ! "

" एकनाथ ? असा गोरटा, तरतरीत मुलगा आहे का ? "

" होय हो ! "

" अठरा वीस वर्षांचा ? "

" हो—पाहिला का कुठं ? "

" हो पाहिला. "

" कुठं ? "

" देवगिरीवर. तिथं जनार्दनस्वामी नांवाचे फार मोठे सत्पुरुष. त्यांच्या जवळ मीं असा एकनाथ नांवाचा मुलगा पाहिला. "

जीव मुठींत धरून आजाआजींनीं विचारलं,

" किती दिवस झाले ? "

" झालीं चार वर्षं. "

वाऱ्याचं वाहन करून आजाआजी देवगिरीला पोचलीं. तिथं त्यांनीं जनार्दनपंतांचे पाय आंसवांनीं भिजवून काढले. पंतांनीं मोठ्या ममतेनं विचारलं,

" कुठलीं आपण ? "

" पैठणचीं—"

" आमच्या एकोबाच्या गांवाचीं ? "

"मी त्याचा आजा–"

"अन् मी आजी–"

"अरे वा! एकोबा भाग्याचा खरा. तुमच्यासारखीं आजाआजी लाभलीं–"

"पण आम्ही दुर्भाग्याचीं!"

"छे छे! तुमच्या भाग्याला अंत ना पार! एकोबा फार गुणी मुलगा!"

"पण तो आकाशांतला चांदोबा!"

"आकाशांतला नव्हे. तो घरीं परत येईल आतां. इथं राहिला. शहाणा झाला. जगाचा उद्धार करील तो."

"स्वामी, आमचं म्हणणं तो ऐकेल?"

"माझं ऐकेल."

"तुमचं म्हणणं त्याला कसं कळायचं?"

"मी पत्र देतों."

पंतांनीं पत्र दिलं.

"चिरंजीव राजश्री एकनाथ यास अनेकोत्तम आशीर्वाद, पैठणासच राहून सांगितलियाप्रमाणें जगदुद्धार करावा."

पत्र मस्तकीं धरून आजाआजी परतलीं. तीं दोघं चातकासारखी एकनाथाची वाट पाहूं लागलीं.

अन् एका सकाळीं एकनाथ पैठणांत शिरले!

तेंच गांव. तींच घरं. तींच देवळं. तीच गोदामाई. आज बारा वर्षांनीं भेटत आहेत सगळीं. प्रसन्ननाथ एका पिंपळाखालीं बसले.

गोरंपान शरीर. देखणी मुद्रा. तोंडावर समाधानाचं तेज झळाळतं आहे. असे एकनाथ लोकांनीं पाहिले. कुजबूज सुरू झाली.

"कोण रे हे योगी?"

"अरे! आपल्या एकनाथासारखे दिसतात!"

"अरे हो! खरं कीं!"

"तेच ते!"

"अरे मग पळा! चक्रपाणींना जाऊन सांगा!"

चक्रपाणींनीं ती बातमी ऐकली, अन् आजाआजी विजेच्या पावलांनीं पिंपळाखालीं धांवलीं. खरं असेल कीं खोटं असेल? कीं आमची गंमत चालवली आहे या लोकांनीं?

तहानलीं गुरं पाण्याकडे धांवलीं. चुकली हरणी पाडसाकडे धांवली. पान्हावली गाय वासराकडे धांवली.

एकनाथांनीं त्या दोघांना पाहिलं. ताबडतोब उठून त्यांनीं आजीला घट्ट मिठी मारली. ती मायलेकरांची मिठी. तिचं वर्णन काय करावं?

आजी स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. रडतां रडतां बोलूं लागली.

"एका! माझ्या वासरा! कुठं होतास रे इतके दिवस! कसा निष्ठुर झालास! आम्हां अनाथांना टाकून कुठं गेला होतास? कसं तुझ्याच्यानं राहावलं इतकीं वर्षं? रडून रडून माझी दृष्टि हारपायला आली! तूं कसा पाषाण बनलास रे?"

एकनाथांनीं आजीच्या पाठीवर हात फिरवीत तिला शांत केलं. तिची समजूत घातली. मात्र ती एकनाथाला सोडीना!

"सोड कीं ग आजी!"

"ऊं हूं!"

"अग पण मला माझ्या गुरुमाउलीला भेटायचंय्!"

लगेच चक्रपाणींनीं पत्र पुढं टाकलं. नाथांनीं तें अक्षर पाहिलं. लगेच उचलून तें मस्तकीं धरलं. उघडून वाचलं. प्रसन्न मुद्रेनं ते म्हणाले,

"गुरुमाउलीची आज्ञा प्रमाण!"

आजाआजींचा जीव भांड्यांत पडला, पण एकनाथ घरीं येईनात! ते म्हणाले,

"जिथं गुरुदेवांची आज्ञा मीं वाचली, तिथून हलायचा नाहीं मी."

"कुठं का राहीनास! पैठण सोडूं नको म्हणजे झालं."

अन् मग तिथंच भक्तीची पाणपोई उघडली नाथांनीं. त्यांची वाणी अत्यंत रसाळ. श्रोते अगदीं गुळाला चिकटलेल्या मुंगळ्यासारखे त्यांच्या-जवळून हलायचे नाहींत. रात्रंदिवस हरिनामाचा गजर सुरू झाला.

त्या कीर्तनांना सगळा गांव लोटायचा. ब्राह्मण, शेतकरी, शिपाई, सुतार, सोनार, लोहार, कासार, वैदू, वडारी, कोल्हाटी, महार, मांग, झाडून सगळे. नाथ अगदीं सोपें बोलायचे. लोकांच्या भाषेत. त्यांना हसवीत, खुलवीत, खेळवीत ते परमार्थ सांगायचे. त्यांनीं कीर्तनाची मर्यादा घालून दिली. देवाचीं चरित्रं गावींत. सज्जनांनीं माना डोलवाव्यात, अशी भक्ति बोलावी. ज्ञान सांगावं. चांगलं सोपं विवरण करावं.

सगुणचरित्रें परमपवित्रें सादर वर्णावीं ।
सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥
संतसंगें अंतररंगें नाम बोलावें ।
कीर्तनरंगीं देवासन्निध सुखें डोलावें ।
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या ।
प्रेमभरें वैराग्याच्या युक्ती विवराव्या ॥
जेणेंकरुनी मूर्ति ठसावे अंतरिं श्रीहरिची ।
ऐसी कीर्तनमर्यादा हे संतांच्या घरची ।
अद्वयभजनें अखंडस्मरणें वाजवि करटाळी ।
एकाजनार्दनीं मुक्त होय तत्काळीं ॥

अन् मग जो कांहीं रंग जमला आहे! नाथ थांबले तिथं हळूहळू वाडा उभा राहिला. सगळं कसं सोईनं जमून आलं.

पुढं आली गोकुळाष्टमी. मग तर काय! रात्रंदिवस हरिभजनाचा रंग जमूं लागला. पैठणकरांनीं उत्सव मांडला. चहूंकडे वार्ता गेली. तशी ती देवगिरीलाहि पोंचली.

पंतांनीं ऐकली ती वार्ता, तसे ते पैठणाला निघाले. एकटेच एका सायंकाळीं नाथांच्या वाड्यांत येऊन पोंचले. इकडे कां कोण जाणे, नाथांना सारखी हुरहुर लागली होती. शकुन होऊं लागले होते. गुरु-माउलींची सारखी आठवण होत होती. ते थोडे अस्वस्थ झाले होते. उतावीळ झाले होते.

अन् सायंकाळीं दारांत जनार्दनपंत उभे! पाहतांच नाथांना जो कांहीं आनंद झाला आहे! डोळे वाहूं लागले. रोमांच उभे ठाकले. अंग थरथरलं. धांवतच जाऊन त्यांनीं गुरुचरणीं मिठी मारली. पंतांनीं नाथांना उचलून थोपटीत विचारलं,

"एकोबा, बरा आहेस ना?"

"आपल्या कृपाप्रसादानं!"

अन् मग उत्सवांत जो कांहीं आनंद आला आहे! ज्यांनीं तो उत्सव पाहिला ते लोक भाग्याचे. सगळे भक्त येताहेत. कुणाला तिथं प्रतिबंध नाहीं ते सगळे आपापलीं सांसारिक दुःखं बरोबर घेऊन येतात. नाथांचं कीर्तन ऐकतात.

नाथ सांगतात,

"बाबा रे! नशिबांत लिहिलेलं दुःख-तें तर भोगलंच पाहिजे. तर मग रडतां कां? शूरपणानं भोगा. त्याच्याशीं झुंजायला तयार व्हा.

होणार जाणार न चुके कल्पान्तीं।
वाउगी कुंथाकुंथी करुनी काय॥

"उगाच मनांत तो शीण कशाला वाहा? सोडा ती चिंता. देवाचं स्मरण करा. तो तुम्हांला शक्ति देईल—या सगळ्याशीं टक्कर द्यायला."

न चुके न चुके भोगल्यावांचोनी।
वायांचि तो मनीं शीण वाहे॥
एकाजनार्दनीं वासना टाकून।
हरीचे भजनीं सावध होई॥

ग्रा. क्र. ६८७८ नों. दि.

कधीं पंतांनीं प्रवचन करावं. कधीं नाथांनीं. अशा भक्तीच्या गदारोळांत गोकुळाष्टमी झाली. काला झाला. अन् मग पंत परतायच्या गोष्टी बोलूं लागले. तों आजीनं पटकन् येऊन त्यांचे पाय धरले. पंतांनीं म्हटलं,

" काय हें आजी ! "

" मला अभय द्या. "

" अहो, नाथ हा अभयरूपच आहे. "

" पण तो लोकांना. मला काय ? "

" तुमची काय इच्छा आहे ? "

" दुसरी कांहीं नाहीं. ही वंशवेल पुढं चालावी."

" ठीक आहे. मी सांगेन नाथाला."

" आत्तां सांगा."

लगेच नाथाला बोलावलं पंतांनीं.

" काय आज्ञा आहे ? "

" अरे, तुझी आजी काय म्हणते ? "

" ती म्हणत्ये, एक्या फार वाईट मुलगा आहे."

" असं कसं रे म्हणेन ! माझ्यासारखी भाग्यवती बाई शोधून मिळायची नाहीं."

" मग काय म्हणतेस ? "

" तूं लग्न कर ! "

नाथ पंतांकडे पाहूं लागले. पंतांनीं म्हातारीला अनुमोदन दिलं,

" खरंच कर नाथा. तूं जो अभययोग सांगणार आहेस सगळ्यांना, त्यांत तुला जोडीदारीण हवी."

" पण ती कशा स्वभावाची–"

" तूं काळजी करूं नकोस. तुला फार चांगली बायको मिळेल."

" जशी स्वामींची आज्ञा ! "

अन् स्वामींचं वचन खरं झालं. एका दिवशीं शेजारच्या गांवचे एक सुखवस्तु गृहस्थ आले पैठणला. त्यांनीं नाथांचं कीर्तन ऐकलं. परम संतोष झाला. लगेच ते चक्रपाणीला भेटले. नांवगांव सांगितलं. क्षेम-कुशल पुसलं अन् मग म्हणाले,

" बाबा, माझ्या मनीं एक इच्छा आहे."

" कसली ? "

" दृष्ट लागेल अशी देखणी माझी मुलगी. नुसती दिसायला नव्हे, स्वभावानंहि. ती नाथांना द्यायची ! "

मग काय विचारतां ! पैठणकर मंडळी अशी हरिखली ! सगळा गांव नाथांचा. खूप जोरांत तयारी सुरू झाली. आयाबाया कामाला लागल्या. पापड, शेवया, गव्हले, नखुल्या, फणुल्या, नानापरी. जो तो धांवतोय्. म्हणतोय्,

" मला कांहीं तरी काम सांगा. "

नाथांचा एक दूरचा नातलग. उद्धव त्याचं नांव. त्याच्या घरीं कोणी नाहीं, पण मोठा कामाचा गडी. त्यानं नाथांच्या घरचं हें कौतुक ऐकलं. लगेच धांवत आला. कंबर बांधून कामाला लागला. सगळी तयारी कशी देखणी झाली.

अन् मग एका शुभमुहूर्तावर लग्न पार पडलं. गिरिजाबाई नाथांच्या झाल्या.

अगदीं नांवासारखी गिरिजा. तशीच गोरी. तशीच देखणी. तशीच गोड स्वभावाची. तशीच कामसू. आजाआजींचे डोळे कौतुकानं अगदीं निवले.

गिरिजा आणि उद्धव या दोघांनीं घर सांभाळलं. नाथांच्या घरीं मोठा राबता. कोण्या गोष्टीचा उणेपणा नव्हता खरा. पण एवढ्या मंडळींचं करायचं कुणी? आजाआजीला मोठी चिंता होती. आतां ती नाहींशी झाली.

नाथ तर रात्रंदिवस जनसेवेंत दंग. हा आला, याचे डोळे पुसायचे.

तो आला, त्याला धीर द्यायचा. पलीकडल्याचं दुःख मऊ हातांनीं दूर करायचं. अलीकडल्याची सेवाशुश्रूषा करायची.

मग घरांतली सगळी व्यवस्था गिरिजा आणि उद्धवाकडे. पण नुसतीं गिरिजा अन् उद्धव नव्हेत. आणखी एक गडी येऊन त्या रंगणांत उभा ठाकला. कोण ?

• • •

## ८. स्वकरें चंदन घाशी

त्याचं नांव श्रीखंड्या !

एका दिवशीं तो आला. नाथांचे पाय धरले त्यानं. नाथ हसून म्हणाले,

"काय हवंय् तुम्हांला ?"

"कांहीं नाहीं."

"मग माझे पाय कां धरलेत ?"

"मला इथं राहायचंय्."

"राहा. कथा पुराण चालतं, तें ऐकत जा."

"तसं नव्हे."

"मग ?"

"मी चांगला जाडाजुडा आहें. कांहीं काम सांगा."

"काम ? तर मग भजनांत टाळ वाजवीत जा."

"तें नव्हे. घरांतलं."

"बरं पण तुम्ही राहणार कुठले ?"

"कुठला ? मला आठवत नाहीं."

"वाः ! आई ? वडील ?"

"ऊंहूं ! नाहींच आठवत कांहीं."

"बरं बरं ! राहा हां इथं !"

"पण काम ?"

"तें घरांत जाऊन विचारा."

श्रीखंड्या घरांत गेला. गिरिजाबाई भाजी चिरीत होत्या. हा त्यांच्या-समोर जाऊन उभा राहिला.

"काय हवंय्, बाबा ?"

"काम हवं कांहीं तरी. नाथांनीं सांगितलंय्."

"काय काय येतं तुला ?"

"मला ? मला सगळं येतं घरांतलं. भाजी चिरतां येते. ताक करतां येतं. चंदन उगाळतां येतं. नदीवरून पाणी आणतां येतं. केर काढतां येतो.—"

गिरिजाबाई हसून उठत म्हणाल्या,

"भाजी येते ना चिरतां ? चीर बघूं !"

श्रीखंड्या बसला विळीवर, अन् त्यानं अशी कांहीं देखणी भाजी चिरली ! गिरिजाबाई अगदीं प्रसन्न झाल्या. श्रीखंड्यानं विचारलं,

"येत्ये ना मला ?"

"येत्ये रे बाबा ! अशी तर मलाहि येत नाहीं."

"मग राहूं ना इथं ?"

"राहा हो !"

अन् मग श्रीखंड्या त्या घरांत सगळ्यांचा अगदीं आवडता झाला. थकवा कसा तो माहीत नाहीं. सारखे कामाचे डोंगर उलथे पालथे करतोय्. कधीं रिकामा बसायचा नाहीं. नाथांची पूजेची तयारी त्यानं करून द्यावी. चंदन त्यानं उगाळावं. कावड घेऊन पाणी त्यानं भरावं. गिरिजाबाईंना वाटलं, हा आपला भाऊच आहे धाकटा !

काम संपल्यावर त्यानं म्हणावं,

"आई, भूक लागली !"

"होय रे बाबा! तुझीच वाट पाहात्यें मघापासून."

मग गिरिजाबाईनीं जवळ बसून त्याला पोटभर जेऊं घालावं!

झालं. नाथांनीं आपलं काम सुरू केलं. जें जनार्दनपंतांनीं सांगितलं होतं तें. त्यांनीं कीर्तनाच्या पंगती उठवाव्या. भजनांचीं भोजनं घालावीं. कुणीं कुणीं यावं त्या पंगतींना?

सगळ्यांनीं. ब्राह्मण येत, माळकरी येत, संत येत. पण हें कांहीं आश्चर्य नव्हे. नाथांच्या वाड्यांत सगळ्यांना मोकळीक. कुणाला कोणी आडवीत नाहीं. कुडबुड्या जोशी, बाळसंतोष, वासुदेव, पांगुळ, सरोदा, दिवटा, कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, वाघ्या, कंजारी, व्यापारी, आडबंग, सैनिक, येसकर, मांग, जागल्ये, गोंधळी, गारुडी, जोगी, वैदू—अशी सगळ्यांची गर्दी व्हायची नाथांच्या कीर्तनाला.

एवढ्यानंच भागलं नाहीं. शीख यायचे, मानभाव यायचे, जंगमहि यायचे, अन् हबशी यायचे, फकीर यायचे, दरवेशीसुद्धां यायचे! सगळ्यांना वाटायचं,

"एकनाथ हमारा है!"

कां वाटायचं?

नाथ अगदीं त्यांच्या भाषेंत बोलायचे. त्यांच्या गमती जमती सांगायचे. त्यांना हसवायचे. त्यांना भजन करायला लावायचे. त्यांना परमार्थांत गुंतवायचे.

कधीं त्यांनीं म्हणावं,

"मी कुडबुड्या जोशी आहें बरं का! सावध राहा! शकुन सांगतोंय् आडवाटेनं जाऊं नका. फशीं पडाल!"

सावध रहा नाना सावध रहा नाना ।
समज कांहीं तरी धरा तुमच्या मनीं ।
नका जाऊं आडवाटे ।
तेथें लगती चपेटे ॥
दांत विचकून पडसी नेटें ।
उगेच पाहा ॥

...ालय,
अनुक्रम ...
विभाग ...
क्रमांक ...
नों. दि. ...

तर कधीं म्हणावं,

" ऐका मंडळी ! मी सरोदा आलोंय्. अहंकार धरूं नका. काळ भराभर चाललाय्. सावध राहा रे गडे हो ! "

डुग डुग डुग जाती ब्रह्माण्डयुग ।
अहो त्या अहंममतेच्या पोटीं ।
नका कीं जी जाऊं राजांनो ॥

कधीं दिवट्याचं सोंग काढून नाथ गंमत करी.

" मी तर दिवटा ! लंका नांवाचं खेडेंगांव. तिथं मी बडबड करूं लागलों. रावणाला उपदेश केला तर तो लेकाच । रावण मला म्हणे, हा खोटारडा अगदीं राक्षसासारखा बोलतो ! "

पैल लंकेचा चोहोटा ।
तेथें मी एक बोललों दिवटा ॥
तो रांडेचा रावण म्हणे हा दिवटा खोटा ।
राक्षसावानीच बोले ॥

कधीं कोल्हाट्यासारखी हळूच एक उडी मारून नाथ म्हणत,

" ढुम ढुम ढुम ढुम ढुम ! आम्ही कोल्हाटी रे गडे हो ! आमची उलटी सुलटी उडी ! एका उडींत आम्ही ब्रह्मापर्यंत जाऊन पोहोंचलों!

आम्ही कोल्हाटी कोल्हाटी ।
आमची उडी उलटी सुलटी ॥
सोहं शब्दें ढोलकें पिटी ।
आमचें वास्तव्य त्रिपुटीं ॥

कधीं ते डोंबारी बनत.

" लग लग लग लग लग ! मी निराकाराचा डोंबारी. तिन्ही लोकांत मी भटकून येतों. चारी युगांच्या खबरी सांगतों ! "

मी निराकाराचा डोंबारी ।
तिन्ही लोकीं माझी फेरी ॥

चारी युगांच्या खबरी।
तुज सांगेन रे गव्हारा॥

एखादे वेळीं ते मानभाव बनत.

"बाई! भिक्षा वाढा. मी मानभाव आलों आहें. कामक्रोध पायांत बांधून हिंडतों आहें. मत्सराला माझ्या घरीं थारा नाहीं."

मानभाव आलों बाई।
मज भिक्षा वाढा कांहीं॥
कामक्रोध आम्हीं बांधोनिया पायीं।
मत्सर भेद अहंकार अव्हेरिला बाई॥

येसकराची बोली बोलून नाथ म्हणत,

"जोहार मायबाप. जरा सांभाळून राहा. इंद्र अन् चंद्र हे विषयाच्या नादीं लागले. दोघांचीहि खोड मोडली. तेव्हां माझं येसकाचं ऐका."

इंद्र चंद्र महामुनी
पाडिले विषयावर्ती
एका जनार्दनीं धरा भक्ती।
मी येसकर आलों कीं जी मायबाप॥

कधीं मांगाचीहि बोली बोलून नाथ म्हणत,

"माझं मांगाचं ऐका बरं पाटीलबुवा! अहो मनाजी पाटील, आपली बाईल, तिचं नांव ममता. तिला जरा चार गोष्टी सांगा. नाहीं तर मग झाडाला उलटी टांगावी लागेल हां!"

एका जनार्दनीं मांग।
पाटील आपल्या नारीला सांग॥
सांगितलं करीं काम।
नाहीं तर उरफाळ्या झाडासी टांग।
हयात मायबाप हयात॥

फकीर बनून नाथ म्हणत,

"बाबा, हम सफेद कलंदर फकीर हैं!. कामक्रोधको हमने काट डाला है!"

सफेद कलंदर फकीर।
बाबा सफेद कलंदर फकीर
कामक्रोध मदमत्सर काट्यो।
बाबा सफेद कलंदर फकीर॥

एखादेवेळीं नाथांनीं "चल चल चल" असा आरडा करून गारुड्याचं सोंग आणावं. "चल चल चल चल! गुरूची आठवण करा. आदिपुरुष, संत, महंत, गुणी, गुणवंत, यांची आठवण करा. ऐ हंडीबाग, मायेंतून पार कसा होशील? चौऱ्यांशी लक्ष योनींचा फेरा कसा चुकेल? तो अल्लाचं स्मरण केल्यानं चुकेल. अल्ला कुठं आहे? तो पंढरपुरीं विटेवर उभा आहे!"

चल चल चल चल।
याद करो गुरु गारुडकी।
और आदिपुरुषकी।
सन्तमहन्तकी याद कर।
गुणी गुणवंतकी याद कर।
चल चल चल हंडीबाग।
हां हां जी।
मायासे पार कैसा पडेगा?
चौऱ्यांसीका फेरा कैसा कटेगा?
चल चल चल अल्लाका नाम बडा है।
वो अल्ला नाम वीटपर खडा है॥

असा सगळ्यांचा मेळ केला. हसत, गंमत करीत. नाथ मोठे थट्टेखोर, त्यांनीं नानापरीच्या गंमती कराव्या. हसून हसून लोकांच्या मुरकुंड्या वळाव्या. एकदां नाथ म्हणाले,

"उंडगी वाई बाजाराला निघाली आहे. तिला रहाट करायचा आहे. ती नवऱ्याला म्हणते, माझ्या रहाटाला तात हवी. नवरा म्हणाला, कुठून आणूं? उंडगी म्हणते, तुमचा बैल मारून त्याच्या आंतड्याची करा! तुमची तरवार मोडून मला चाती करून द्या. तुमचा टाळ मोडून मला भिंगरी करून द्या. तुमचं धोतर फाडा. तें पिंजून मला पेळू करून द्या. मग माझ्याकडे पाहात बसा."

उंडगी निघाली बाजारा।
तुमचा बैल कां माराना।
मजला तांत करून कां द्याना।
तुमची तरवार कां मोडाना।
मजला चात करून कां द्याना।
तुमचा टाळ कां मोडाना।
मला भिंगरी करून कां द्याना।
तुमचीं वस्त्रें कां फाडाना।
मला पिंजून पिंजून कां द्याना।
माझ्या पिंजण्याकडे कां पहाना॥

कधीं नाथ "मला हा नवरा नको" अशी मिस्कील तक्रार करायचे. कधीं सासऱ्याला मारण्याबद्दल भवानीला रोडग्याची लालूच दाखवायचे. कधीं पोरांना हसूं नका असं बजावीत शिमग्याचं गाणं गायचे.

पहिल्या-पहिल्यांदा शास्त्री-पंडितांनाहि मजा वाटली. सगळा गांव नाथांच्या वाड्यांत गोळा व्हायचा. हेहि जायचे. पण हळू हळू नाथ त्यांचीं बिंगं बाहेर काढूं लागले. त्यांचा दंभ उघडा पाडूं लागले. तसे मग ते संतापले. नाथांची फजिती कशी करतां येईल तें पाहूं लागले.

"काय हो शास्त्रीबुवा!"

"काय म्हणतां?"

"अहो, हा एकनाथ माजत चालला!"

" आमची टवाळी करतो ! "

" आपण मोठे शांतीचा पुतळा असल्याचा आव आणतो ! "

" अहो, कसला आलाय् शांतीचा पुतळा ! आम्ही वाटेला गेलों नाहीं तोंपर्यंत."

" पण एकदां फजिती केली पाहिजे बरं का याची ! "

ती संधि लौकरच चालून आली. एक बापडा गरीब ब्राह्मण पैठणांत शिरला. एका देवळाच्या ओट्यावर चार संभावित शास्त्री बसलेले दिसले. त्यांच्या पायां पडून तो म्हणाला,

" माझं गरिबाचं घर बुडतंय्—मला मदत करा."

" काय झालं रे बाबा ? "

" माझ्या मुलीचं लग्न उभं राह्यलं—"

" मग ? "

" दोनशें रुपये हुंडा मागतो मुलाचा बाप ! कांहींहि करा—"

" अरे पण आम्ही कुठून द्यायचे रुपये ? "

" पायां पडतों तुमच्या ! "

पटकन् एका शास्त्र्याला सुचली युक्ति. तो म्हणाला,

" ए भल्या माणसा, तूं एक काम करशील ? "

" सांगाल तें करीन."

" तर मग इथं एकनाथ नांवाचा—"

" माहीत आहे मला. मोठे साधुपुरुष आहेत."

" डोंबल्याचा साधुपुरुष ! लुच्चा आहे. शांतीचं ढोंग करतो. त्याला राग आणून दाखवशील ? "

नडला ब्राह्मण. कबूल झाला.

" जा तर. मग करूं तुझ्या रुपयांची व्यवस्था."

ब्राह्मण बाचकत बाचकत वाड्यांत शिरला. नाथांचा लहानगा

मुलगा बाहेर खेळत होता. नाथ देवघरांत पूजा करीत होते. ब्राह्मण जो जोड्यासुद्धां गेला, तो थेट नाथांच्या मांडीवर !

नाथांनीं हें प्रकरण पाहिलं, तसे ते हसून म्हणाले,

" ऐकलंत का ! गूळपाणी आणा. हा माझा फार आवडीचा मित्र आला मला भेटायला. अगदीं जोडे काढण्याचं सुद्धां भान राहिलं नाहीं त्याला."

ओशाळून ब्राह्मणाचं पार निर्माल्य झालं ! तो उठला. नाथांच्या पायां पडत म्हणाला,

" नाहीं महाराज."

" वा वा ! नाहीं कसं ? तुमची आमची ओळख फार जुनी ! युगायुगांची ! "

" चुकलों महाराज ! "

" छे छे ! आतां थोडा वेळ विसांवा घ्या. मग जेवून घेऊं."

ब्राह्मणाला वाटलं, फसलं काम. आतां कांहीं दोनशें मिळत नाहींत. पण त्यानं पुन्हा एकदां प्रयत्न करायचा ठरवला. पंगत बसली. नाथां-घरीं रोजच अतिथी अभ्यागत. पांचपंचवीस पान व्हायचं. मंडळींनीं पुंडलीक वरदेचा गजर केला. जेवायला सुरुवात केली. अन्नपूर्णा गिरिजाबाई वाढप करूं लागल्या.

ब्राह्मण जेवत होता. घायकुतला होता. रुपयांची चिंता लागली होती त्याला. त्यानं एक मूर्खपणा केलान् ! पटकन् उडी मारून गिरिजाबाईंच्या पाठीवर बसला !

सगळी पंगत थक्क झाली ! ब्राह्मणाला वाटलं, आतां नाथ संतापणार ! पण—नाथ हसून म्हणाले,

" सांभाळा हां ! ब्राह्मण पडेल ! "

गिरिजाबाई म्हणजे नाथांचीच पत्नी. त्या म्हणाल्या,

" नाहीं पडायचा. माझं लेंकरूं नाहीं का पाठीवर बसत ? हें थोडं मोठं आहे एवढंच काय तें."

ब्राह्मण नाथांच्या पायांवर कोसळून रडायला लागला.

"क्षमा करा हो महाराज ! मी फार पापी आहें !"

"क्षमा कशाबद्दल करायची ? अन् क्षमा करतों देव."

मग ब्राह्मण आपली कुळकथा सांगून म्हणाला,

"त्यांनीं मला तुम्हांला राग आणायला सांगितलं-"

"हात्तिच्या ! आधीं बोललां असतात तर ! बरं. आतां जेवण होऊं द्या."

जेवण झाल्यावर नाथांनीं ब्राह्मणाच्या पंचांत दोनशें रुपये बांधले, अन् त्याला म्हणाले,

"आतां तुम्ही त्या वाटेनं निघा. मी तुम्हांला आणखी दोनशें देववतों."

ब्राह्मण बाहेर पडला, अन् त्याच्या मागं नाथ त्याला शिव्या देत बांहेर धांवले ! कुटाळांच्या समोर जाऊन नाथ म्हणाले,

"रागावलों मी. द्या आतां ब्राह्मणाला दोनशें रुपये !"

मुकाट्यानं रुपये आणून मोजले त्या संभावितांनीं !

• • •

## ९. समता वर्तावी

पण या पंडितांच्या मताप्रमाणं नाथांनीं अगदीं ताळ सोडला ! वाटेल तसं वागायला लागले पार धर्म रसातळाला नेला !

आणि नाथ जों जों ते गोरगरिबांचीं दुःखं पाहात, तों तों त्यांचं मन जसं उचंबळून येई. काय करूं म्हणजे यांचीं दुःखं दूर होतील ?

हीं सगळीं तर माणसंच आहेत. देवाघरचीं माणसं. महाराला काय तीन कान असतात ? मांगाला काय शिंगं असतात ? तर मग हे शास्त्री त्यांना दूर कां लोटतात ? जवळ कां घेत नाहींत ? त्यांचीं आंसवं कां पुशीत नाहींत ?

न कां पुशीनात. मीच पुशीन.

एकदां नाथ माध्याह्न स्नानाला चालले. ऊन कडक तापलेलं. भलं थोरलं वाळवंट. पाय जसे भाजून निघताहेत, पापड भाजल्यासारखे. अन् त्या आगींत एक नागडं उघडं पोर रडत आरडत उभं आहे ! त्याची आई हरवली. त्याला सांपडत नाहीं. तें आकाशपाताळ एक करतंय्. पण कुणी त्याच्याजवळ नाहीं. कुणी त्याला उचलीत नाहीं.

कारण तें महाराचं आहे !

नाथांचं थोर मन पान्हवलं. धांवत जाऊन त्यांनीं त्याला कडेवर घेतलं. त्याच्या डोक्यावर आपलं नेसूंचं धोतर घातलं. त्याचं नाक पुसलं. डोळे पुसले. तें लेंकरूंहि नाथांच्या खांद्यावर डोकं टेकून विसावलं !

पण नदीवर केवढा आकान्त ! लोक म्हणायला लागले,

"अहो एकनाथ ! खालीं टाका तें पोर !"

"कां हो ?"

"अहो, तें महाराचं आहे ना !"

"मग ?"

"मग ? अहो, विटाळ झाला ना ?"

"विटाळ झाला ?"

"हो ना ! द्या त्याला खालीं सोडून. मरूं द्या. तडफडूं द्या. कशाला पोरं होतात कोण जाणे एवढीं !"

नाथांनीं त्या बोलणाराकडे एकदां दृष्टि उचलून पाहिलं. मग म्हणाले,

"देव तुमचं बरं करो."

नाथ पोराला घेऊन निघाले. लोक म्हणाले,

"अरे ! तुम्ही तर त्याला मिरवीत निघालांत !"

"मिरवीत नाहीं. सांभाळून नेतों."

"कुठं ?"

"त्याच्या आईकडे !"

नाथ थेट महारवाड्यांत पोंचले. त्यांना पाहतांच भराभरा माणसं गोळा झालीं. नाथ आले! महारवाड्यांत! त्या बापड्यांना केवढा आनंद! केवढा संतोष! त्यांनीं एकच गदारोळ केला.

"नाथ आले! आमचे नाथ आले! आमचे नाथ!"

तेवढ्यांत त्या लेंकराची आई आली. तिच्याजवळ पोर देऊन नाथ म्हणाले,

"मायमाउली, असं लेंकराला सोडूं नये एकटं! किती तापलं आहे बरं वाळवंट!"

त्या बाईनं नाथांचे पाय घट्ट धरले!

बातमी गांवभर झाली. शास्त्री कडाकडा दांत खायला लागले. कुटाळ म्हणूं लागले,

"झालं! आतां प्रलय जवळ येणार!"

"तर काय! अहो, हा ब्राह्मणाचा कार्टा! धडधडीत महारवाड्यांत गेला!"

जग बुडणार या कल्पनेनं सनातन्यांच्या तोंडचं पाणी पळालं. ते महादेवावर अभिषेक करीत त्याला म्हणूं लागले,

"अरे देवा! हा नतद्रष्ट असा भ्रष्टाचार करतो! तुला कसं पाहावतं हें!"

पण एवढ्यानं काय झालं! नाथांनीं आणखी एक प्रकार केला. त्यानं तर सगळ्या सनातन्यांच्या अंगाला जणूं कुणीं पेटलेले पलिते बांधले!

नाथांच्या घरीं श्राद्ध. त्यांनीं ब्राह्मणांना निमंत्रण केलं. कांहीं इष्टमित्र बोलावले. स्वयंपाक सुरू झाला. श्रीखंड्याची धांवपळ सुरू झाली. पाणी करूं कीं भाजी चिरूं. रांगोळ्या काढूं कीं पत्रावळी मांडूं. गिरिजाबाईना दम खायला फुरसत नाहीं.

सुग्रास स्वयंपाक शिजूं लागला. आळीभर वास सुटला. खिरीचा अन् शिऱ्याचा. वड्यांचा अन् कढीचा. पुरणाचा अन् तळणाचा.

कांहीं महार अन् महारणी त्या वाटेनं चालल्या. त्या वासानं त्यांच्या तोंडाला पाणी सुटलं. नेहमीं कांहीं तरी खायचं. कसं तरी पोट भरायचं. भाकर आहे तर चटणी नाहीं. चटणी आहे तर मीठ नाहीं. अन् आज अशा सुग्रास अन्नाचा वास त्यांच्या नाकीं लागला. त्यांचीं मनं आनंदानं हुरळून गेलीं. एक पोर आईच्या ओच्याला मुरकुंड मारून म्हणालं,

"आयो!"

"काय!"

"वास कसला येतोय्? तें मला दे!"

"कसला येतोय् हो?"

"अग, कुण्या बामणाच्या घरीं स्वयंपाक चाललाय्–"

"अहाहा! वडे अन् खीर! पापड अन् पुरण–"

"अग गप्प!"

"कां हो!"

"अग! आपल्या भाग्यांत कुठं लिवलंय् त्यें? तसं असतं, तर ह्यो म्हाराचा जलम कशाला मिळता?"

"चल ल्येकरा, चल!"

"न्हाई! मला खीर द्ये! वडे द्ये।"

आईनं त्या लेंकराच्या पाठींत एक धपाटा घातला!

हें सगळं चाललं होतं नाथांच्या वाड्यासमोर. नाथ ऐकत होते. तो दयासागर उचंबळला. चटकन् ते रस्त्यावर आले. त्यांनीं हांक मारून म्हटलं,

"थांबा बाबांनो!"

महार थांबले. नाथ म्हणाले,

"चला माझ्या घरीं. तुमचीच वाट पाहात आहे. गेल्याबरोबर जेवायला बसायचं."

महार काचकुच करूं लागले. ते येईनात. शेवटीं नाथांनीं त्यांच्या

दंडांना धरून आंत ओढलं. ओळीनं पंगत बसविली. सुग्रास अन्न वाढलं. पुंडलीक वरदेचा गजर केला. अन् महार मंडळी जेऊं लागली !

कधीं बापजन्मीं तसलं अन्न मिळालं नव्हतं. अगदीं घशाशीं येई-स्तोंवर खाल्लं. नाथांनीं अन् गिरिजाबाईंनीं आग्रह करकरून वाढलं. शेवटीं महारहि थकले. त्यांना विडे देऊन बोळवलं. उष्टीं काढलीं. पुनः स्वयंपाक केला. अन् नाथ ब्राह्मणांना बोलवायला बाहेर पडले.

पण—

सगळीकडे जणूं वणवा पेटला होता !

"आमच्या आधीं म्हारांना जेऊं घालतो !"

"चांडाळाला पाण्यांत बुडवलं पाहिजे !"

"गांवांतून हांकून दिलं पाहिजे."

"काजीसाहेबांकडून फटके मारवले पाहिजेत !

नाथ घरोघर हिंडूं लागले. पण कोणी त्यांच्याशीं शब्द कांहीं बोलेना ! शेवटीं नाथ घरीं परतले, अन् श्रीखंड्याला म्हणाले,

"श्रीखंड्या ! श्राद्ध राहिलं गड्या !"

"कां ?"

"अरे, ब्राह्मण येत नाहींत !"

"त्यांचे पितर येतील. आपण पानं वाढूं या !"

"म्हणतोस काय !"

"आपण तूप वाढायला घ्यायचं म्हणतों."

श्रीखंड्याचा एवढा आग्रह पाहिला, तेव्हां मग पानं वाढलीं. बाहेर वाड्याच्या दाराशीं ब्राह्मण पहारा करीत बसले. कोण जेवायला जाईल त्याची धिंड काढायची. त्याला वाळींत टाकायचा. पण पाहतात तों काय ! आंतून मोरे श्लोकांचा गजर ऐकूं येऊं लागला !

"कोण रे हरभट !"

"कोण जाणे गड्या ! आवाज तर माझ्या तात्यांसारखा येतो !"

"अरे हो! आमचे बाबा हे!"

"अन् हे आमचे नाना!"

"अरे मांडलं आहे तरी काय या एक्यानं!"

सगळे दाराच्या फटींतून पाहूं लागले. तों काय आश्चर्य! त्या सगळ्या ब्रह्मवृंदांचे पितर मारे कढी अन् खीर ओरपीत होते!

सगळ्यांनीं लाजून माना खालीं दडवल्या!

* * *

## १०. अग्निपरीक्षा

नाथांच्या घरचा आनंद वाढूं लागला. संध्याकाळीं पुराणाला ही गर्दी. मुंगीलाहि वाव मिळायचा नाहीं. नाथांनीं त्या भोळ्या भाविकांसाठीं भागवतावर टीका सुरू केली. रसाळ टीका. अगोदरच नाथांची वाणी मोठी गोड. त्यांत ज्ञानोबाच्या ज्ञानेश्वरीचे संस्कार झालेले. त्यामुळं नाथ बोलूं लागले कीं, जशी प्राजक्ताचीं फुलं सांडताहेत आकाशांतून!

असा नाथांच्या वाणीचा आनंद लुटायला खूप गर्दी जमायची. सगळं घर खच्चून भरायचं. एकदां एक वडारी अन् वडारीणाहि आली पोथी ऐकायला.त्यांना कुठं जागा मिळेना. मग तीं नाथांच्या शयनगृहांत शिरलीं. तिथं पलंगावर बसलीं दोघं. त्यांना मोठं बरं वाटलं. वडारीण म्हणाली,

"अय्यो! किती मऊ हाय गादी!"

"लई मऊ! जशीं कोंबडीचीं पिसं अंथरलींत!"

दिवसभर दगड फोडफोडून थकलीं होतीं दोघं. लागली झालं तिथंच झोंप. प्रवचन आटोपलं. नाथ झोंपायला आले. मागं उद्धव होता. नाथांनीं पाहिलं; तेव्हां तें हसून म्हणाले,

"उद्धवा! पाहिलंस?"

"अरे! कोण हीं? एः! चला उठा!"

पटकन् नाथांनीं उद्धवाच्या तोंडावर हात ठेवला अन् म्हणाले,

"उद्धवा ! अरे ही देवाची झोंप आहे ! त्यांच्यांतला देव विसांवला आहे पलंगावर. उठवूं नकोस."

"पण—"

"अरे पण नाहीं अन् कांहीं नाहीं. मी झोंपेन खालीं."

पहाटे वडारी जागा झाला. त्याला आपण कुठं आहोंत तें आठवेना. तो वडारणीला ढोसून म्हणाला,

"ए ! ऊठ ! अगो भुताटकी !"

ती जागी झाली, अन् टकाटका इकडे तिकडे बघूं लागली ! तों नाथ आंत आले. प्रसन्नमुखानं ते म्हणाले,

"काय वडारीदादा ! बरी आली ना झोंप ?"

मग कुठं वडाऱ्याला आठवलं. त्यानं धाडकन् नाथांच्या पायीं लोटांगण घातलं, अन् म्हणूं लागला,

"फार आप्राध घडला. फार आप्राध घडला—"

"अरे, कांहीं नाहीं अपराध. मी रोजच झोंपतों पलंगावर. कालची रात्र तुम्हीं झोंपलांत इतकंच काय तें."

नाथांनीं त्या नवराबायकोला एक धोतर अन् लुगडं दिलं, अन् त्यांची बोळवण केली.

पण एक प्रसंग याहून बांका !

राणू महार नांवाचा एक फार चांगला माणूस रोज नाथांच्या प्रवचनाला यायचा. तो मोठा सात्त्विक होता. वाईटवकटं खायचा नाहीं. अन्यायानं वागायचा नाहीं. रोज स्नान करायचा. देवाला नैवेद्य दाखवायचा अन् मग जेवायचा. जसा राणू तशी त्याची बायको.

फार दिवस राणूच्या बायकोला वाटे, नाथांनीं आपल्या घरीं प्रसाद घ्यावा. ती म्हणे,

"काय हो ! येतील का नाथ आपल्या घरीं ?"

"अग, म्हणत्येस काय ?"

"कां ? काय झालं ?"

"नाथ ? आपल्या घरीं ? महाराच्या ?"

"वाः ! न यायला काय झालं ? ते तर सांगतात, कीं परमात्मा सगळीकडे भरलेला आहे. तर मग तो आपल्यांतहि नाहीं का ?"

"अग, असं तर सगळेच बुवा सांगत असतात."

"पण नाथ त्या बुवांहून अगदीं वेगळे आहेत."

"आहेत खरे वेगळे."

"मग विचाराल ?"

"पाहीन बुवा विचारून !"

अन् मग त्या सायंकाळीं प्रवचन आटोपलं. प्रसाद वांटला जाऊं लागला, अन् भीत भीत राणू उभा राहिला. नाथांनीं त्याला पाहिलं. म्हणाले,

"काय झालं राणबा ?"

"नाहीं— "

"सांगा ना !"

"आपण— "

"भिऊं नका. बोला !"

"आपण-आपण माझ्या झोपडींत जेवायला याल ?"

सगळी मंडळी थक्क झाली ! केवढं साहस हें ! एक म्हारडा नाथांना जेवायला बोलावतो ? सगळे खाऊं कीं गिळूं म्हणून पाहायला लागले राणूकडे. पण नाथ ? त्यांनीं काय केलं ?

ते गोडसं हसले. मग म्हणाले,

"केव्हां येऊं ?"

"केव्हांहि—"

"उद्यां येऊं ?"

"हो !"

" बरं हां ! येईन उद्यां ! "

अन् विजेसारखी बातमी पसरली गांवभर. शेंड्या झटकीत अन् शालजोड्या सांवरीत शास्त्रीपंडित मंडळी धांवूं लागली. एकत्र जमूं लागली. पुन्हा धांवूं लागली.

" काय हो ! आतां जग बुडालं का राहिलं ! "

" बुडालं—बुडालं ! पार बुडालं ! "

" अधर्माचा कळस झाला. "

" आतां देव अवतार घेणार ! "

" घेणार घेणार ! "

" नाहीं पण तुम्ही सांगा अशानं प्रलय होणार नाहीं का ? "

" होणार होणार ! "

" शास्त्रांत सांगितलंच आहे तसं ! "

दुसरा दिवस उजाडला, अन् मंडळी पुन्हा धांवपळ करूं लागली.

" मग कसं करायचं शास्त्रीबुवा ? "

" त्या चांडाळाला जाऊं द्यायचा नाहीं. "

" अहो पण गांवचे खूप लोक त्याचे भक्त ! शेतकरी, वाणी, म्हार, चांभार—"

" अरे हो खरंच कीं ! "

" आपण त्याला अडवलं, अन् त्या लोकांनीं आपल्याला धरून बाजूला केलं तर ? "

" आपल्याला विटाळ होईल कीं ! "

" मारायचे सुद्धां ! या लोकांचा भरंवसा नाहीं. "

" असे मारामारी काय करतांय् म्हणावं ! चर्चा करायला या ! "

" मग काय करायचं ? "

" काय करायचं ? "

शेवटीं कांहींच केलं नाहीं ! नुसतेच नाथ कसे जातात, तें पाहात बसले.

इकडे राणूच्या पत्नीला केवढा आनंद! तिला वाटलं, कीं प्रत्यक्ष वैकुंठच येतंय् आपल्या घरीं. तिनं पहाटपासून उठून सडा घातला, रांगोळ्या काढल्या, तोरणं लावलीं, अन् चारी ठाव स्वयंपाक सुरू केला.

उद्धवानं नाथांना विचारलं,

"नाथा, खरंच जाणार तुम्ही?"

"नको जाऊं?"

"तसं नव्हे–पण–"

"उद्धवा, अरे आपण सांगतों, सर्वांभूतीं परमात्मा आहे. ती नुसती बडबडच का? नाहीं रे नाहीं! खरोखरीच आहे तो. तुझ्यांत, माझ्यांत, तसाच राणूंतहि आहे. मला दिसतो आहे. त्या परमात्म्यानं जेवायला बोलावलं. मग नाहीं म्हणूं?"

"तसं नाहीं म्हणत मी–"

"मग कसं म्हणतोस?"

"लोक काय म्हणतील?"

"काय? हा एक्या वेडा आहे म्हणतील. एवढंच ना? अरे, लोक दोन्ही बाजूंनीं बोलतात. आपण तिकडे लक्ष कां द्यायचं? मनाला निर्मळ वाटेल तें करावं!"

"आपण कराल तें चांगलंच कराल."

दुपारीं राणू आला. हात जोडून म्हणाला,

"चलायचं नाथा!"

नाथ तयारच होते. म्हणाले,

"चला!"

निघाले नाथ! रस्त्यानं ही गर्दी! सगळे टुकुटुकु पाहताहेत! शास्त्री अन् सनातनी म्हणताहेत,

"छे छे! नको तें पाहणं! यापेक्षां डोळे मिटलेले पुरवले!"

पण नुसतं म्हणताहेत. हातून घडत कांहीं नाहीं. टकाटका डोळे सगळ्यांपेक्षां मोठाले करून पाहताहेत! म्हणताहेत,

"देवा! तूंच आहेस रे बाबा! आमचे डोळे झांकीत कां नाहींस?"

नाथ महारवाड्यांत पोंचले. राणूच्या घरीं शिरले. राणू अन् त्याची बायको दोघंहि आनंदानं नुसतीं फुलून गेलीं! नाथांना कुठं ठेवूं अन् कुठं नाहीं! त्यांचे पाय घट्ट धरून राणू म्हणाला,

"देवा! एवढं केलंत! एक करा कीं आतां!"

"काय राणबा?"

"मरण द्या आम्हांला!"

"मरण?"

"व्हय्. असंच तुमच्या पायीं डोई ठेवली असतां मरण."

"काय राणबा हें!"

"नाथ महाराज! अहो, मी म्हार.. सगळ्या गांवाची ओवाळणी! कुणीं माझ्याकडे रागावून सुद्धां पाहायचं नाहीं. शिव्या मला द्यायच्या, पाहायचं तिसऱ्याकडे. विटाळ होईल ना? तें माझं घर तुमचीं पावलं लागून धन्यधन्य झालं। आतां कशाला जगूं?"

"नाहीं राणबा. जगायचं. भक्तीचा आनंद भोगायचा. त्या आनंदांत मग्न असायचं. समजलं ना?"

"जशी आज्ञा महाराज!"

मग राणूच्या बायकोनं नाथांना वाढलं. आग्रह करकरून वाढलं. नाथहि मोठ्या तृप्तीनं जेवले.

अन् इकडे घरीं?" श्रीखंड्या म्हणाला,

"आई, मी गंमत करतों."

"कसली रे बाबा?"

"या टवाळांची. पाहा तर खरी।"

त्यानं नाथांचा वेष केला, अन् पुराण सांगायला बसला. दिसे हुबेहूब

नाथांसारखा. पुराण सुरू झाल्याबरोबर लोक धांवले. अन् आश्चर्य पाहा. अगदीं नाथांसारखं सांगणं. त्यांच्यासारखी थट्टा. त्यांच्यासारखी गंमत.

भराभर लोक जमले. सनातनी मंडळी बुचकळ्यांत पडली. हें काय होतंय्?

"काय हो, लोक का धांवताहेत तिकडे?"

"कां म्हणजे? नाथ पुराण सांगताहेत ना!"

"नाथ? अहो तो म्हारडा तर राणूच्या घरीं खीर ओरपीत बसला आहे!"

"वेडे कीं काय! जाऊन पाहा!"

पाहतात तों खरंच! तिथून धांवत धांवत अगदीं महारवाड्यांत सुद्धां गेले लोक. तिथंहि नाथ, इथंही नाथ! इकडे पुराण सांगताहेत, इकडे जेवताहेत.

"आश्चर्य! महदाश्चर्य!"

"अहो आश्चर्य म्हणजे काय! मीं डोळ्यांनीं पाहिलं माझ्या!"

"काय पाहिलंत?"

"ती भुताटकी—अहो, इकडे खीरहि तोच ओरपतोय्, इकडे पुराणहि तोच सांगतोय्!"

• • •

## ११. देव भावाचा भुकेला

श्रीखंड्यानं अशी मजा केली. नाथांच्या प्रपंचांत तो अगदीं एकरूप होऊन गेला. पण एके दिवशीं श्रीखंड्याचं बिंग बाहेर फुटलं!

एक भक्त द्वारकेला अनुष्ठान करूं लागला. देव मला भेटावा. किती तरी दिवस त्याचं अनुष्ठान चाललं. अन् एका रात्रीं त्याला दृष्टान्त झाला.

एक गुराखी त्याच्या स्वप्नांत आला. म्हणतो,

" काय हवंय् तुला ?"

" देवाचं दर्शन."

हसून गुराखी म्हणाला,

" वेड्या, देव द्वारकेला आहे, असं कुणीं सांगितलं तुला ?"

" मग ?"

" अरे तो भक्ताच्या घरीं राबत असतो. पैठणला जा तूं. तिथं नाथाच्या घरीं तो भेटेल."

" कोणत्या नांवानं नांदतोय् तो ?"

" श्रीखंड्या !"

भक्त धांवत पळत पैठणला आला. नाथांची चौकशी करीत तो वाड्यांत शिरला, तों त्याला अगोदर दिसला श्रीखंड्या. भक्तानं त्याला ओळखलं नाहीं. विचारलं,

" काय हो ! नाथांचा वाडा कोणचा ?"

" हाच."

" इथं कोणी श्रीखंड्या राहतो का ?"

" हो."

" कुठं आहे तो ?"

" आंत तपास करा."

वेडा भक्त आंत गेला. श्रीखंड्या जो कावड घेऊन नदीवर गेला, तो तिकडेच ! भक्त नाथांकडे पोंचला. नाथांनीं स्वागत करीत त्याला म्हटलं,

" कुठून आलांत आपण ?"

" द्वारकेहून."

" फार लांबून आलांत. बसा जरा, विसांवा घ्या."

" विसांवा मग घेईन. मला माझा श्रीहरी भेटवा अगोदर."

" श्रीहरी ? अहो, तुमच्या रूपानं कोण खेळतोय् ?"

" वेदान्त ऐकलाय् मीं पुष्कळ. मला श्रीहरी हवाय्. खराखुरा."

"अन् तो इथं आहे?"

"हो. मला दृष्टान्त झाला."

"काय?"

"श्रीखंड्या असं नांव घेऊन तो इथं नांदतो आहे!"

"हरे राम! आत्तां उमगलं!" नाथांनीं कळवळून हांक मारली,

"श्रीखंड्या! अरे सांवळ्या!"

पण श्रीखंड्या कुठं आहे? त्याचा पत्ता नाहीं कुठं.

नाथांचे डोळे भरभरून वाहायला लागले. ते म्हणाले,

"मुकुंदा! असं फसवलंस ना! अरे तूं इथं काय म्हणून केलं नाहींस! पाणी वाहिलंस. चंदन उगाळलंस. उष्टीं काढलींस. शेण लावलंस. भाजी चिरलीस. कणीक भिजवलीस! अन् मला मागमूसहि लागूं दिला नाहींस ना?"

गिरिजाबाई आल्या, अन् आंसवं ढाळीत म्हणाल्या,

"मीं चांडाळणीनं भांडीं कीं हो घासायला लावलीं त्याला! हरि पंडिताला खेळवायला सांगितलं? सांगा ना हो? कां असं फसवलंन् त्यानं?"

"कोण जाणे कां तें? कां त्यानं अशी मोहिनी घातलीन्? कां आम्हांला भुलवलंन्? मुरारे! बरं केलंस बाबा! बरं केलंस!"

तोंच चांदण्यासारख्या प्रकाशानं घर भरलं. श्रीहरी साक्षात् उभा राहिला. घवघवीत रूप. गळ्यांत वैजयंती. कटीला पीतांबर. हसून तो बोलला,

"नाथा! मी जर या रूपानं तुमच्या इथं राहिलों असतों, तर तुम्हीं काम करूं दिलं असतं का मला? मी भक्तीचा भुकेला. म्हणून तुमच्या घरीं उष्टी काढीत कांहीं दिवस काढले!"

सगळ्यांनीं श्रीहरीच्या चरणीं मस्तकें ठेवलीं. त्यांचं जिणं धन्य झालं.

• • •

# १२. प्रतिशुद्ध ज्ञानेश्वरी

ज्ञानोबांच्या ठाईं नाथांचा मोठा भक्तिभाव. ते पंढरीला जात. तिथं वाळवंटांत नाचतांना म्हणत,

" ज्ञानोबा माझा कैवल्याचा पुतळा आहे. तो चैतन्याचा जिव्हाळा आहे. साधकांचा मायबाप आहे. तो सर्वांना सुखरूप आहे. त्याचं दर्शन घडलं, कीं सगळीं पापं नाहींशीं होतात.

कैवल्याचा पुतळा।
प्रगटला भूतळा।
चैतन्याचा जिव्हाळा।
ज्ञानोबा माझा।
साधकाचा मायबाप।
दरुशनें हरी ताप।
सर्वांभूतीं सुखरूप।
ज्ञानोबा माझा॥

" त्याला वारंवार शरण जावं. त्याचीं चरणकमलं प्रक्षालावींत. त्याला क्षेम-आलिंगन द्यावं. कारण माझा ज्ञानोबा त्रैलोक्याचं जीवन आहे.

गुरुसेवेलागीं जाण।
शरण एकाजनार्दन॥
त्रैलोक्याचें जीवन।
ज्ञानोबा माझा॥

रात्रंदिवस एकनाथ ज्ञानेश्वरीचं मनन करीत. चिंतन करीत. एकदां नाथ झोंपले होते. तों त्यांना स्वप्न पडलं. तेजाची मूर्ति ज्ञानदेव त्यांच्या घरीं आले. त्यांना म्हणाले,

" नाथा, मीं अजानवृक्षाखालीं समाधि घेतली. त्याची मुळी माझ्या गळ्याला येऊन भिडली आहे. तेवढी येऊन काढ."

श्रीज्ञानदेवें येवोनी स्वप्नांत।
सांगितली मात मजलागीं॥
दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा।
परब्रह्म केवळ बोलतसे॥
अजानवृक्षाची मुळी कंठासी लागली।
येवोनि आळंदी स्थळीं काढीं वेगीं॥

संग्रहा
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. 3
वाचनालय

नाथ झडझडून उठले. त्यांनीं मंडळींना सांगितलं,

"आम्ही आळंदीला जाणार!"

"कशाला?"

"ज्ञानराजाला भेटायला."

हें ऐकतांच नाथांच्याबरोबर वैष्णवांचा भार लोटला. दिंड्या, पताका, गरुडटक्के, असा फार मोठा थाट. वाटेंत गांवोगांवीं भजनकीर्तनांचा आनंद गाजवीत मंडळी आळंदीला आली.

पण आळंदी गांव जाग्यावर राहिलं नव्हतं! ज्ञानेशाचं गांव लढाईच्या धामधुमींत उठून गेलं होतं. गांवाभोंवतीं सगळं रान माजलं होतं. सिद्धेश्वराचं देऊळ त्या झाडींत लोपलं होतं. समाधीहि कुठं सांपडेनाशी झाली होती.

नाथांनीं म्हटलं आहे,

आणीक एक चमत्कार।
तेव्हां उध्वस्त अलंकापूर॥

मोठ्या श्रमांनीं मंडळी इंद्रायणीच्या तीरापर्यंत पोंचली. तिथून पुढं तर अजिबातच वाट नाहीं. मंडळी म्हणाली,

"नाथमहाराज, आतां कसं करायचं?"

"तुम्हीं इथं थांबायचं."

"अन् आपण?"

"आम्हीं ज्ञानाईच्या शोधाला जायचं."

"एकटेच ?"

"हो. ज्ञानाईला भेटेन, तेव्हांच परतेन मी."

"नाहीं भेटले तर ?"

"तर तर–"

नाथ कांहीं बोललेच नाहींत. ते निर्धारानं त्या झाडींत शिरले. किती तरी जनावरं. लांडगे, डुकरं, साप. पण निर्धार होता ना बरोबर !

शेवटीं सिद्धेश्वराचं राऊळ दिसलं नाथांना. त्यांना ब्रह्मानंद झाला. ते धांवत धडपडत देवळांत गेले. महादेवासमोर मस्तक टेकवून ते म्हणाले,

"आदिनाथा, तुमचा शिष्य तुमच्यासमोर समाधि लावून बसला आहे. त्याचं दर्शन घडूं द्या. त्याच्या चरणीं हें मस्तक टेकूं द्या."

अन् ते नंदीजवळ येऊन जरा टेकले, तों त्यांच्या भारानं नंदी बाजूला सरकला ! भुयाराचा मार्ग मोकळा झाला.

नाथांना आईचं सुख लाभलं नव्हतं. आतां त्यांना वाटलं, माझी आई भेटते आहे मला ! ते गदगदून म्हणूं लागले,

"आई ! ज्ञानाबाई ! तुझं लेंकरूं तुझ्या भेटीला आलं. त्याला खांद्यावर घे ग ! त्याला उचलून घे. आतां तुला नमस्कार करूं ? कीं तुझी पूजा करूं ? तूं माझी जन्मव्याधि दूर केलीस. तूं इन्द्रायणीच्या तटीं विसांवलीस ! आज मला दर्शन दिलंस. आतां मी तुझं ध्यान धरीन. तुझं भजन करीन. तुलाच–एकट्या तुलाच शरण येईन !"

ज्ञानाबाई माझी अनाथाची माय ।
एकाजनार्दनीं पाय वंदातसे ॥
कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर ।
तया नमस्कार वारंवार ॥
अहो दयाळे ज्ञानाबाई ।
आर्त माझें तुझे पायीं ॥

इन्द्रायणीचे तटीं ।
ज्ञानाबाई हो गोमटी ॥
ऐसी ज्ञानाबाई ध्याऊं ।
एका जनार्दनीं शरण जाऊं ॥

नाथ भावावेशांत आंत शिरले. त्यांनीं ज्ञानोबा पाहिला ! सिद्धासन घालून बसलेला. नयनसंपुटं झांकोळलेलीं. दोन्ही हात द्रोणासारखे गुडघ्यांवर विसांवलेले. तेजाचा पुतळा. इतके दिवस ज्याच्याविषयीं चिंतन केलं होतं, तो ज्ञानोबा !

नाथांना ब्रह्मानंद झाला ! आनंदाचं रडूं फुटलं. ते ज्ञानोबाच्या पायीं कोसळले. ज्ञानोबानं त्यांना आलिंगन दिलं. दोघे उराउरीं भेटले. दोघेहि कांहीं बोलले नाहींत. न बोलतांच ज्ञानोबांनीं "ये हृदयींचें तें हृदयीं घातिलें !"

मग मिठी सोडून नाथांनीं पुनः ज्ञानोबाच्या चरणीं मस्तक ठेवलं. म्हणाले,

"ज्ञानदेवा, माझी एवढी विनंती मान्य करा ! आपण माझ्या अंतरीं बसावं. मला सतत जागं ठेवावं. माझ्याकडून हा भक्तीचा प्रपंच करून घ्यावा. अहो श्रेष्ठा ज्ञानदेवा, आपलं स्मरण माझ्या मनीं जागतं असूं द्या."

माझी ऐकावी विनंती ।
ज्ञानदेवा श्रेष्ठमूर्ती ॥
तुम्ही बैसोनी अंतरीं ।
मज जागवा निर्धारीं ॥
तुम्ही सत्ताधारी ।
प्रपंच करावा बाहेरी ।
श्रेष्ठा ज्ञानदेवा ।
एकाजनार्दनीं आठवा ॥

ज्ञानोबांनीं नाथांना अभय दिलं. मस्तकीं हात ठेवला, अन् विचारलं, "नाथा ! कसा काय सांप्रदाय चालवलास ?"

नाथांनीं सगळा परिहार दिला. आजपर्यंत काय काय केलं तें सांगितलं. पैठणच्या हरिरंगणाची माहिती दिली. ऐकून ज्ञानोबा संतुष्ट झाले. म्हणाले,

"भले नाथा! आमच्या कुळीं कुळदीपक निपजलास तूं. आतां आणखी एक काम कर."

"कोणतं?"

"ज्ञानेश्वरींत कितीतरी अपपाठ शिरले आहेत. लोक काय वाटेल तें लिहून घेतात. वाटेल तें वाचतात. तेवढी ती ज्ञानेश्वरी शुद्ध कर."

"ज्ञानेश्वरी? मला कसं जुळेल तें?"

"जुळेल. तुला नाहीं जुळलं, तर मग कुणाला जुळेल?"

"जशी आज्ञा."

पुन्हा एकदां ज्ञानोबांना जीव भरून भेटून घेतलं. डोळे भरून पाहून घेतलं. मग नाथ बाहेर आले. समाधीचा चिरा होता तसा बसवला.

त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या प्रती गोळा केल्या. वाचल्या. तों खरंच. लोकांनीं काय वाटेल तें लिहून घेतलं होतं! पहिलीच ओवी—

ॐ नमो जी आद्या।

तिचं त्यांनीं केलं होतं,

ॐ न मोजीं आध्यावो

म्हणजे अध्याय मोजूं नकोस! तो सोन्यामोत्याचा ग्रंथ. सगळी माती झाली होती त्याची. नाथांनीं त्याचा पाठ ठरवून दिला. त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या शेवटीं म्हटलं आहे,

"हा ग्रंथ पूर्वीं अगदीं शुद्ध होता. पण पाठांतरांनीं तो अशुद्ध झाला. आतां मी तो पुन्हा होता तसा केला आहे. आतां जो कोणी या ग्रंथांत नवी ओवी करून घालील, तो अमृताच्या ताटांत नरोटी ठेवील!

**ग्रंथ पूर्वींच अतिशुद्ध।**
**परी पाठांतरीं शुद्ध अबद्ध।**
**तो शोधूनियां एवंविध।**
**प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी।**

ज्ञानेश्वरीपाठीं ।
जो ओवी करील मऱ्हाटी ।।
तेणें अमृताचे ताटीं ।
जाण नरोटी ठेविली ।।

ज्ञानेश्वरी शुद्ध करण्याचें हें काम शके १५०६ मध्यें नाथांनीं संपवलं.

श्री शके पंधराशें साहोत्तरीं ।
तारण नाम संवत्सरीं ।।
एका जनार्दनें अत्यादरीं ।
गीता ज्ञानेश्वरी प्रतिशुद्ध केली ।।

• • •

## १३. रसाळ भागवत

नाथांची भागवत टीका मोठी रसाळ. जसे खडीसाखरेचे खडे. त्यामुळं जो तो ती टीका लिहून घ्यायचा.

एका ब्राह्मणानं मोठ्या आग्रहानं जेवढी झाली तेवढी टीका लिहून घेतली, अन् तो काशीला गेला. तिथं स्नान उरकून तो घाटावर मोठ्या श्रद्धेनं भागवतटीका वाचीत बसला.

काशींत एक फार विद्वान् संन्यासी राहायचा. त्याचे शिष्य गंगेवर आले. हा ब्राह्मण कांहीं तरी बडबडतोय्, एवढं त्यांना कळलं. ते त्याला म्हणाले,

"ये क्या पढ रहे हैं?"

"ही टीका आहे."

"टीका? किस ग्रंथकी टीका?"

" भागवताची—एकादश स्कंधाची ! "

भडकले शिष्य. त्यांनीं डोळे वटारीत विचारलं,

" किस भाषामें है ? "

" मराठींत."

लगेच त्यांनीं त्या ब्राह्मणाला फरफटत मठांत गुरुमहाराजांसमोर नेलं, अन् म्हणाले,

" स्वामीजी ! आज्ञा हो, इसे क्या सजा दी जाय ? "

" काय केलं यानं ? "

" हा भागतावरील मराठी टीका वाचीत होता."

भागवतावर टीका ? मराठी भाषेंत ? केवढा अपराध ! केवढा गुन्हा ! संन्याशानं दरडावून विचारलं,

" कुणीं केली ही टीका ? "

" मीं नाहीं."

" मग कुणीं ? "

" पैठणच्या एकनाथ महाराजांनीं—फार मोठे साधुपुरुष—"

" अरे, असे साधुपुरुष काशींत पैशाला टोपलंभर मिळतात ! हें पैठण दक्षिणेंतलंच ना ? "

" हो स्वामी ! "

स्वामींनीं लगेच फर्मान लिहिलं. या घोर अपराधाचा जाब द्यायला नाथांना काशींत बोलावलं. तें फर्मान लगेच पैठणला रवाना झालं.

तें नाथांच्या हातीं पडलं, तेव्हां ते हसले. ते म्हणाले,

" किती हसूं आणणारी गोष्ट ! संस्कृत भाषेंत काव्य केलं, कीं तो महाकवि होतो. अन् मराठींत केलं, कीं तो काय गुन्हेगार ? गाईचं तेवढं दूध अन् आईचांहि दूधच नव्हे का ?

" संस्कृत भाषा काय देवानं केली ? अन् मराठी काय चोरांची भाषा ? काय म्हणावं या अभिमानाला ? संस्कृत तेवढं वंद्य. अन् प्राकृताची काय निंदा करायची ? "

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी ।
मा प्राकृतीं काय उणीवी ? ।।
कपिलेचें म्हणावें क्षीर ।
मा इतरांचें काय तें नीर ।।
वर्णस्वादें एकचि मधुर ।
दिसे साचार सारिखें ।।
संस्कृतवाणी देवें केली ।
प्राकृत तरी काय चोरापासोनि झाली ? ।।
असोतु या अभिमान भुलीं ।
वृथा बोलीं काय काज ।।
संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य ।
हे बोल काय होती शुद्ध ? ।।

तरी त्यांनीं काशीला जायचं ठरवलं. बरोबर झालेली सर्व टीका घेतली, अन् साधुसंतांच्या मेळाव्याबरोबर हरिनाम जागवीत ते काशीला आले.

संन्याशाच्या शिष्यांना हें कळलं. त्यांनीं ठरवलं कीं संस्कृत ग्रंथाची अप्रतिष्ठा करणारा हा माणूस ! याला अगोदरच चांगला प्रसाद द्यायचा. खूप मारून मग गुरुजींकडे न्यायचा.

त्या बेतानं ते नाथ उतरले तिथं पोंचले. पण नाथांची प्रसन्न मूर्ति पाहिल्यावर त्यांचा हात कांहीं उचलेना !

नाथ मठांत पोंचले. संन्याशापर्यंत बातमी पोंचली होती. नाथ त्याच्या पायां पडूं गेले, तों तो कडाडला—

"जा जा ! तोंड दाखवूं नकोस मला."

"पण आपणच मला बोलावलंत–"

"बोलावलं म्हणजे ? बोलावलंच. भ्रष्टा ! भागवतावर मराठींत टीका करतोस ? प्राकृत भाषेंत ?"

" स्वामी ! व्यासांनीं भागवत कुणासाठीं लिहिलं हें मला सांगण्याची कृपा कराल का ? "

" कुणासाठीं म्हणजे ? ज्यांना वेदाचा अधिकार नाहीं, अशांसाठीं."

" मग त्याच्यापर्यंत तें पोंचायला नको का ? राहूं दे का त्यांना अंधारांत ? अन् आपण असं करतां का ? "

" काय ? "

" मी आपल्या टीका वाचून दाखवतों."

" मला ? भले ! आम्ही नाहीं ऐकत तें पाखंड ! "

" चार विद्वानांना ऐकूं द्या. अन् माझी टीका जर भागवताचा अर्थ सोडून असेल, तर–तर–"

" तर काय ? "

" तर मी माझी टीका इथंच गंगेंत बुडवून टाकीन."

" पण मलाच ऐकली पाहिजे तुझी टीका–ऐक. मी पडद्याआड बसेन ! "

" चालेल."

अन् मग पडद्याआड बसलेल्या संन्याशासमोर नाथांचं भागवत सुरू झालं. ही गर्दी जमली. सगळे ती सभा उधळून लावावयाच्या तयारीनं आले होते. सगळं वातावरण तंग होतं. अशा त्या सभेंत नाथांची अमृतवाणी वाहूं लागली

नाथ बोलताहेत,

" महाराज, मी काय बोलेन ? हें तर सगळं श्रीगुरु बोलायला लावतात. ही कवितेची बाग त्यांची आहे. हिला ब्रह्मरसाचं पाणी दिलंय् त्यांनीं."

हे जनार्दनकवितावाडी ।
ब्रह्मरसें रसाळ गाढी ॥
जे जनार्दनें लाविली गोडी ।
ते चवी न सोडी ग्रंथार्थ ॥

" आकाशांत सूर्य उगवावा, मग जळांत कमलानं उमलावं, तशी मी बोलतों ही जनार्दनांची कृपा. "

गगनीं उगवतां अंशुमाळी ।
जेविं विकासिजे नवकमळीं ॥
तेवीं जनार्दनकृपामेळीं ।
कवित्वनवाळी विलासे ॥

" अन् त्यांत एकादश स्कंधासारखा विषय. इथं परमार्थाचं सदावर्त आहे. किती तरी कवि इथं जेवून गेले. मग मीच जेवलों तर तो अपराध झाला का ? "

तो हा एकादश ऐसा ग्रंथ ।
येथ ठाकठोक परमार्थ ॥
येणें महाकवि समस्त ।
निजहितार्थ पावले ॥

तिकडे काशीजवळून गंगामाई वाहात होती. इकडे तिच्या कांठीं नाथांची प्रवचनगंगा वाहूं लागली. कोणी कोरडं राहिलं नाहीं. सगळे भिजून निघाले. सगळे विरघळले. ताठा जिरला. अभिमान नाहींसा झाला. सगळ्यांनीं एकमुखानं सांगितलं,

" असं कुठं ऐकलं नाहीं. "

" अशी रसाळ वाणी कधीं कानीं पडली नाहीं. "

" असा संस्कृतचा अर्थ कुणीं सांगितला नाहीं. "

" आज आम्ही धन्य झालों आहोंत ! "

अन् संन्याशानं तर सांगितलं,

" नाथमहाराज, हा ग्रंथ तुम्हांला पुरा केलाच पाहिजे ! "

" आज्ञा ! "

" आज्ञा नव्हे ! प्रार्थना. अन् तो सुद्धां इथं ! "

सगळ्यांनींच आग्रह केला. तेव्हां मग नाथांनीं काशींतच राहून ग्रंथ पुरा केला. मग काशीकरांनीं ठरवलं, कीं त्यांची मिरवणूक काढायची. तयारी काय पुसतां! पालखी, अबदागीर, घोडे, हत्ती! नाथांना मंडळी आग्रह करूं लागली,

"महाराज, आपण हत्तीवर बसायचं."

"छे छे!"

"कां?"

"माझ्याहून आपली योग्यता फार मोठी. आपण सगळे पायीं चालणार अन् मी हत्तीवर बसूं? छे! तें घडायचं नाहीं माझ्या हातून."

मिरवणुकीचा थाट फार झाला. जयघोषानं काशी नगरी दुमदुमली.

नाथ असा भागवत धर्माचा झेंडा फडकावून काशीहून परत निघाले. येतांना त्यांनीं गंगेची कावड रामेश्वरावर घालण्यासाठीं बरोबर घेतली.

वाटेंत माळव्यांत भारी उन्हाळा. मैलच्या मैल पाणी नाहीं. माणसांचं कसं तरी भागे. पण जनावरांचे भारी हाल. एका दुपारीं नाथ कावड घेऊन चालले. बरोबर उद्धवहि चालला. तों त्यांना एक म्हातारं गाढव जमिनीवर हातपाय घाशीत असलेलं दिसलं!

विचारं नुसतं तडफडत होतं! तोंड उघडीत अन् मिटीत होतं. डोळे फार झांजावले होते त्यांचे. त्याला तहान लागली होती. पण कोण पाणी पाजणार त्याला?

नाथांनीं त्या गाढवाला पाहिलं. त्यांचा अंतरात्मा तळमळला. पटकन् त्यांनीं आपल्या कावडीवरली लाख काढली, अन् कावड त्याच्या तोंडीं रिती केली!

उद्धव आश्चर्यानं म्हणाला,

"काय हें! आतां रामेश्वरावर काय घालणार?"

नाथ हसून बोलले,

"हाच माझा रामेश्वर!"

• • •

# १४. भावार्थरामायण

नाथांना सारखं वाटे, या पीडलेल्या जनतेला धीर दिला पाहिजे. यांच्या मनीं धैर्य उपजलं पाहिजे. काय केलं म्हणजे हें होईल? काय सांगितलं म्हणजे हे या संकटांशीं झुंजायला सरसावतील? काय बोललं म्हणजे यांच्या अंगीं चेतना संचरेल?

त्यांना सुचलं. यांना श्रीकृष्णाचा पराक्रम सांगितला पाहिजे. मग त्यांनीं रुक्मिणीस्वयंवर लिहिलं. एकट्या कृष्णानं एवढ्या सैन्याचा पराभव करून रुक्मिणी कशी जिंकून आणली तें सांगितलं. तरी त्यांचं समाधान होईना.

अन् मग जेव्हां त्यांनीं रामायण लिहावं असं ठरवलं, तेव्हां त्यांना ब्रह्मानंद झाला!

रामाची कथा. धनुर्धारी रामाची. एकबाणी रामाची. पतितपावन रामाची. रावणनिर्दालन रामाची. ती कथा सांगायची.

अन् रात्रंदिवस त्यांना रामायणानं घेरलं. दुसरं कांहीं सुचेना. राम सुचूं देईना. जरा दुसरीकडे लक्ष गेलं, कीं रामानं त्यांना जागं करावं. नाथांनीं लिहिलं आहे,

करूं जातां फुकट गोष्टी।
त्यामाजीं रामकथा उठी॥
रामें पुरविली पाठी।
खिळली दृष्टी रामायणीं॥

"मी काय करूं? राम मला धड जेवूंहि देत नाहीं. रात्रंदिवस कथामय करून टाकलं आहे मला. झोंपलों, तर स्वप्नंहि रामायणाचीं पडतात. गाढ झोंप लागली, तर राम जागं करून म्हणतो, कां झोंपलास बाबा? ऊठ, रामायण पुरं कर."

करूं जातां भोजन।
ग्रासोग्रासीं स्मरे रघुनंदन।
मार्गें घालुनी जेवण।
राम रामायण स्वयें वदवी॥
केलें असतां सुषुप्तीं शयन।
श्रीराम थापटी आपण।
म्हणे लिहीं वेगें रामायण।
वृथा निजोन लाभ काय॥

अन् मग त्यांनीं रामायणाची कथा गायिली. रावणाचा रामानं कसा निःपात केला, तें मोठ्या देखण्या भाषेंत सांगितलं. देवांचा शत्रु, सगळ्या जगाचा शत्रु, असा रावण निर्दाळून रामांनीं विश्व सुखी केलं.

देवांचा जो देवघातक।
सकळघातक रावण।
देवद्रोही विश्वद्रोही।
ब्राह्मणांचा ब्रह्मद्रोही।
तो रावण निवटोनि पाहीं।
त्रैलोक्य सर्वही सुखी केलें॥

राम राज्यावर बसले. तिथपर्यंत कथा रचून मग नाथ म्हणाले,
"आतां पुरे!"
"पुढं सांगा कीं!"
"पुढं सांगेल हा आमचा गावबा. आम्हांला आलं बोलावणं!"

• • •

# १५. धन्य ती समाधि

बोलावण्याचं नांव ऐकलं. तसे सगळे हादरले. त्यांनीं धडधडत्या मनानं विचारलं,

"कुठलं बोलावणं नाथा?"

नाथ गोडसं हसून म्हणाले,

"बोलावणं? आमच्या थोरल्या घरचं!"

"थोरलं घर?"

"हो. जिथून आपण सगळीं येतों अन् जातों तिथलं! फाल्गुन महिना उजाडला आहे. पौर्णिमा जवळ उभी ठाकली आहे. ती झाल्यावर षष्ठीला आम्ही जाणार!"

नाथ जाणार हें मंडळींनीं ऐकलं खरं. पण तें कुणाला खरं वाटेना! नाथ जाणार? आमचे नाथ जाणार?

एवढे दिवस त्यांच्या वाणीचं अमृत पीत आलों—एवढे दिवस त्यांच्या कृपाछत्राखालीं काढले—सुखानं, समाधानानं—

ते आमचे नाथ जातों म्हणतात. ज्यांनीं जन्मभर दुसऱ्याकरितां काया झिजविली, गोरगरिबांवर, महारांपोरांवर, बायांबापड्यांवर ज्यांनीं आपल्या मायेचं भलं मोठं पांघरूण घातलं, ते नाथ जातों म्हणतात—

तो मायेचा सागर जातो आहे. "सकळ जीवांचा कृपाळु" जातो आहे. "भक्तिप्रेमाचा कल्लोळु" जातो आहे. "विषयीं विरक्त" जातो आहे. "सर्वदा संतुष्ट" जातो आहे. दीनांचा मायबाप जातो आहे.

छे छे! हें खरं नव्हे! हें खरं नव्हे!

पण—पण नाथ खोटं कशाला बोलतील? ते—ज्यांना कधीं खोटं वागणं खपलं नाहीं, अनाचार खपला नाहीं, ते कशाला खोटं बोलतील?

वार्ता चहूं दिशांना वावटळीसारखी पसरली. सगळ्यांना जणूं काय हादरा बसला. सगळे धांवत आले, आंसवं पुशीत आले. हुंदके आवरीत आले. महार आले, मांग आले, फकीर आले, दरवेशी आले, वैदु आले, वडार आले. सगळे सगळे आले. नाथांच्या वाड्यांभोंवतीं गर्दी मावेना.

अन् नाथ !

ते हसत होते. आल्यागेल्याला कुशल विचारीत होते. लेकरांना जवळ घेत होते. सुनांची थट्टा करीत होते. सासवांना उपदेश करीत होते. दुःखितांचीं आसवं पुसत होते. सगळ्याचं कल्याण इच्छीत होते.

कुणाला ते म्हणत,

"आलं का लक्षांत ! आतां बायका-मुलांना छळायचं नाहीं बरं का !"

कुणाला सांगत,

"आतां म्हातारपणीं प्रपंचांतलं लक्ष जरा कमी करा हां !"

तिसऱ्याला बजावीत,

"पुन्हा असं तरवार टाकून पळून जायचं नाहीं बरं लढाईतून !"

चौथ्याला पाठीवर थापटून आश्वासन देत,

"ग्येनबा, आतां कुणी महार म्हणून दूर लोटायचं नाहीं बरं का तुम्हांला !"

शेवटीं षष्ठी उजाडली. सकाळपासून मंडळींनीं नाथांना घेरलं. सगळे उदास आहेत. नाथ म्हणाले,

उद्धवा, हेंच का माझ्याबरोबर इतकीं वर्षं राहण्याचं फळ ?"

"पण नाथा—"

"कांहीं नाहीं. प्रत्येक जण एकटा येतो. जातोहि एकटा. तो येतांना आपण हसतों. मग जातांना कां रडायचं !"

"हसूं येत नाहीं म्हणून."

" आलं पाहिजे. आपण कडू प्रपंचहि गोड करून घेतों कीं नाहीं? तसंच हें."

दिवस डोक्यावर आला. नाथ गोदातीरीं निघाले. बरोबर संतांचा मेळावा. तिथं वाळवंटांत नाथांनीं शेवटलं निरूपण सुरू केलं. अमृताचं निरूपण. भक्तीचा रंग चहूं हातांनीं उधळला. भावाचीं फुलं चहूं दिशांना फुलविलीं. सगळे त्या धुंदीनं धुंद करून टाकले नाथांनीं.

अन् मग नाथ निघाले. ते पाण्यांत शिरले. गुडघाभर. कंबरभर. छातीभर. अरे! नाथ कुठं आहेत? ते दिसत कां नाहींत?

कसे दिसतील? त्यांनीं आपल्या शरीराचं सोनं केलं. पांच भूतांचं शरीर पांच भूतांना देऊन टाकलं. उरली कीर्ति. तिचा सुवास चहूं दिशांना घमघमतो आहे.

महारापोरांचा पहिला कैवारी म्हणून—
समाजाच्या उपेक्षित वर्गांत जाऊन पोंचणारा पहिला माणूस म्हणून—
त्या पिचलेल्यांच्या भाषेंत बोलणारा पहिला वक्ता म्हणून—
त्यांचीं दुःखं जगापुढं मांडणारा पहिला वकील म्हणून—
मराठी भाषेचा रसाळ कवि म्हणून—
ज्ञानोबाच्या रांकेंतला सन्त सत्पुरुष म्हणून.

बहिणाबाईनं म्हटलं आहे,

" हें भागवत-धर्माचं मंदिर. देखणं मंदिर. भलं मोठं मंदिर. याचा पाया कुणीं रचला? ज्ञानदेवानं. भिंती कुणीं उभारल्या? नामदेवानं. अन् मग त्या मंदिरासमोर फडकणारा—डौलानं गगनांतरीं डोलणारा ध्वज कुणीं उभवला? एकनाथांनीं!"

ज्ञानदेवें रचिला पाया।
उभारिलें देवालया॥
नामा तयाचा किंकर।
तेणें केला हा विस्तार॥
जनार्दन एकनाथ।
ध्वज उभारिला भागवत॥

महाराष्ट्रानं नाथांचं अपरंपार कौतुक केलं. अगदीं आजहि वारकरी भजन करतात,

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई।
एकनाथ नामदेव तुकाराम ॥

पण एवढ्यानं त्यांचं पोट भरेना. म्हणून ते गजर करून म्हणतात,

पुंडलीक वरदा हरिविठ्ठल।
श्रीज्ञानदेव तुकाराम ॥

आणि शेवटीं गदारोळ करतात,

**एकनाथ महाराज की जय ॥**

• • •

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

IRBK-0106579
IRBK-0106979